रविवार, २६ फेब्रुवारी २०२३
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक २१९
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## पश्चिम बंगालमध्ये केंद्रीय मंत्र्याच्या ताफ्यावर हल्ला



**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये केंद्रीय मंत्री निसिथ प्रामाणिक यांच्या ताफ्यावर शनिवारी (दि. २५) हल्ला झाला. कुचबिहार येथे ही धक्कादायक घटना घडली. तृणमूल काँग्रेस समर्थित गुंडांनी हा हल्ला केल्याचा दावा भाजपकडून करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार केंद्रीय गृह, क्रीडा राज्यमंत्री निसिथ प्रामाणिक हे कुचबिहारमधील दिंहाता येथे भाजप नेते आणि कार्यकर्त्यांची भेट घेण्यासाठी जात होते. या वेळी त्यांच्या ताफ्यावर अज्ञात लोकांनी दगडफेक केली. या घटनेनंतर परिसरात तणावाची स्थिती निर्माण झाली. जमावाला नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांकडून अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये एका केंद्रीय मंत्र्यावर अशा प्रकारे हल्ला होत असेल, तर येथे सामान्य माणसाची काय स्थिती असेल, असा सवाल भाजपने उपस्थित केला आहे.

अंतरंग
सावरोलीत गेल कंपनीसमोर आगीचे रौद्ररूप/२
रविवारनिमित्त 'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
महिला विश्वचषक स्पर्धेत आज ऑस्ट्रेलिया-आफ्रिका फायनल/८

# रवींद्र धंगेकरांची उमेदवारी रद्द करा

## भाजपची निवडणूक आयोगाकडे मागणी



**पुणे : प्रतिनिधी**

कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून पोटनिवडणूक लढणारे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांची उमेदवारी रद्द करावी, अशी मागणी भारतीय जनता पक्षाने केली आहे. त्यामुळे निवडणूक आयोग या संदर्भात काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पुण्यातील कसबा पेठ आणि चिंचवड मतदारसंघात रविवारी (दि. २६) पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार आहे. या दोन्ही मतदारसंघांत शुक्रवारी प्रचाराच्या तोफा थंडावल्या. दरम्यान, भाजपने पोलिसांना हाताशी घेऊन कसब्यात पैसे वाटप केले, असा आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी केला व त्याच्या निषेधार्थ उपोषण केले, मात्र तसे काही घडले नसून उलट निवडणूक आयोगाची आचारसंहिता लागू असताना उपोषण करून धंगेकर यांनी या आचारसंहितेचा भंग केला आहे. त्यामुळे त्यांची उमेदवारी रद्द करण्यात यावी, अशी मागणी भाजप नेते राजेश पांडे यांनी केली आहे.

या वेळी राजेश पांडे म्हणाले, मी दोन गोष्टी आपल्याला स्पष्टपणे सांगतो, रवींद्र धंगेकर यांनी आचारसंहितेचा भंग केला आहे. कुठलेही पुरावे नसताना त्यांनी आमच्यावर आरोप केले. पोलिसांवरही आरोप केले. त्यांनी निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेचा भंग केल्यामुळे आम्ही त्यांच्याविरोधात तक्रार करणार आहोत. रवींद्र धंगेकरांची उमेदवारी रद्द करण्यात यावी, अशी आमची मागणी आहे.

> *काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांचे आरोप बिनबुडाचे आहेत. भाजपच्या उमेदवारावर असे खोटे आरोप करून फक्त सहानुभूती निर्माण करण्याचे काम ते करीत आहेत. हा कसब्यातील मतदारांचा अपमान आहे आणि भाजप तो सहन करणार नाही.*
> **–जगदीश मुळीक, भाजप पुणे शहराध्यक्ष**

# येणाऱ्या काळात रायगडचा खासदार भाजपचाच असेल –आमदार प्रशांत ठाकूर



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

येणाऱ्या काळात रायगड लोकसभा मतदारसंघाचा खासदार हा भाजपचाच असेल, असा विश्वास भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. २५) माणगाव येथे व्यक्त केला. कुणबी भवन सभागृहात आयोजित भाजप मंडल कार्यकर्ता संवाद बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, सरचिटणीस अविनाश कोळी, मिलिंद पाटील, सहविस्तारक व रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांभेकर, माणगाव तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे, ज्येष्ठ नेते नाना महाले, महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष हेमा मानकर, युवा मोर्चा दक्षिण जिल्हा अध्यक्ष अमित घाग, उपाध्यक्ष चिन्मय मोने, भाजप तालुका उपाध्यक्ष बाबुराव चव्हाण, शहराध्यक्ष नितीन दसवते, महिला मोर्चा तालुका उपाध्यक्ष यशोधरा गोडबोले, प्राजक्ता शुक्ला, नगरसेवक राजेश मेहता तसेच उमेश साटम, गोविंद कासार, संजय जाधव, दिप्ती नकाशे, निलम काळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते होते.

या वेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, येणाऱ्या काही दिवसांत विकासाचे चक्र व पक्षप्रवेश सुरू होतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या सभा होऊन आपल्या सर्वांना एक प्रकारे उर्जा मिळेल. रायगड लोकसभा मतदारसंघात भाजपचा खासदार आपल्याला निवडून आणायचा आहे. भाजपची संघटना अधिक मजबूत करायची आहे. पक्षाच्या माध्यमातून वेगवेगळे कार्यक्रम जिल्ह्यात घ्यायचे आहेत. त्याचप्रमाणे केंद्र व राज्य सरकारच्या लोकाभिमुख योजना तळागाळातील जनतेपर्यंत कशा पोहचतील या दृष्टीने सर्वांनी काम करायचे आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जलजीवन मिशन योजना सुरू करून घरोघरी नळ कनेक्शन देऊन जनतेला पिण्याचे पाणी पोहचविण्याचे काम केले आहे. ही योजना आम्ही मंजूर केली असे सांगत विरोधक जनतेची दिशाभूल करीत आहेत, मात्र विरोधकांना ही योजना अमलात आणण्याचे जमले नसल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

दरम्यान, या वेळी माणगाव तालुका व शहर भाजपच्या वतीने तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे, शहराध्यक्ष नितीन दसवते, नगरसेवक राजेश मेहता, जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्ष चिन्मय मोने व सहकाऱ्यांनी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचे स्वागत केले.

## काँग्रेसच्या धंगेकरांचा पॉलिटिकल स्टंट; उपमुख्यमंत्री फडणवीसांची टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसचे कसबा पेठ मतदारसंघातील उमेदवार रवींद्र धंगेकर यांचे उपोषण पॉलिटिकल स्टंट असल्याची टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

रवींद्र धंगेकर यांच्या आरोपावर बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आज कुठल्याही प्रकारचा प्रचार करता येत नाही हे माहिती असताना अशा प्रकारचा स्टंट करून एक नवीन प्रकारे प्रचार करण्याचा धंगेकर यांचा प्रयत्न सुरू आहे. पायाखालून जेव्हा वाळू निघून जाते त्या वेळी असे स्टंट केले जातात. हे आचारसंहितेचे उल्लंघन आहे.

पैसे वाटणे ही राष्ट्रवादी आणि काँग्रेसची संस्कृती आहे. भाजपची संस्कृती नाही. आमचा मतदारही असा नाही, जो पैसे घेऊन मतदान करेल. मतदारांचा अवमान करण्याचे काम धंगेकरांनी केले आहे तसेच धंगेकर यांचे हे उपोषण भाजपविरुद्ध नाही, तर मतदारांविरुद्ध आहे, कारण ते मतदारांना विकावू ठरवत आहेत. हे अतिशय चुकीच आहे. देव त्यांना सुबूद्धी देवो, असा टोलाही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी लगावला.

## पुण्यातील पोटनिवडणुकीसाठी आज मतदान; प्रशासन सज्ज

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील चिंचवड आणि कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी रविवारी (दि. २६) मतदान प्रक्रिया होणार आहे. या अनुषंगाने राजकीय पक्षांबरोबरच प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

भाजप आमदार मुक्ता टिळक आणि लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अनुक्रमे कसबा पेठ आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक होत आहे. कसब्यात महायुतीकडून भाजपचे हेमंत रासने आणि महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांच्यात प्रमुख लढत आहे, तर चिंचवडमध्ये महायुतीकडून भाजपच्या अश्विनी जगताप, महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादीचे विठ्ठल (नाना) काटे आणि ठाकरे गटाचे बंडखोर अपक्ष उमेदवार राहुल कलाटे अशी तिरंगी लढत आहे. दोन्ही ठिकाणची मतमोजणी २ मार्चला होणार आहे.

## निवडक

### जहाल नक्षलवाद्याला बेड्या

**गडचिरोली** : एका जहाल नक्षलवाद्याला पोलिसांनी अटक केली आहे. वेल्ला केसे वेलादी (वय ३५, रा. छत्तीसगड) असे त्याचे नाव आहे. पोलिसांनी दामर जंगल परिसरात विशेष अभियान राबवून ही कारवाई केली. त्याला २८ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### 'एअर इंडिया'त मोठी भरती

**मुंबई** : टाटा समूहाची विमान कंपनी एअर इंडियात या वर्षी चार हजार २०० केबिन क्रू आणि ९०० पायलटची भरती करण्यात येणार आहे. टाटा समूहाने जानेवारी २०२२मध्ये 'एअर इंडिया'चे अधिग्रहण केल्यानंतर विस्तार सुरू केला आहे.





**खारघर : येथील सेक्टर २१मधील सचिन तेंडुलकर मैदानात सुरू असलेल्या कामांची पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी पाहणी केली. या वेळी माजी स्थायी समिती सभापती प्रवीण पाटील, भाजप पदाधिकारी वासुदेव पाटील, महापालिकेचे इंजिनियर कर्डिले, कॉन्ट्रॅक्टर जयदीप गिरासे, पप्पू खामकर आदी उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)

## पनवेलमध्ये आज 'माय बोली साजिरी'


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी आणि मराठी राजभाषा दिन यांचे औचित्य साधून भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्ष सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्हातर्फे आयोजित व स्वररंग, डोंबिवली प्रस्तुत 'माय बोली साजिरी मराठी मनाचा कॅनवास' या संस्कृती वृद्धिंगत करणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवारी (दि. २६) सायंकाळी ५.३० वाजता शहरातील गोखले सभागृहात होणार आहे.

या सांस्कृतिक कार्यक्रमात अभंग, ओव्या, कविता, म्हणी, उखाणे, गाणी, संत साहित्य, खाद्य संस्कृती, पेहेराव संस्कृती, शस्त्रास्त्र संस्कृती या सर्वांचा अभिवाचनात्मक आविष्कार असून या कार्यक्रमात लेखक, दिग्दर्शक, संकल्पना, निर्मिती मेघा विश्वास, कलाकार समीर सुमन, तपस्या नेवे, अमेय रानडे, मेघा विश्वास, तर साईड रिदम रूपेश गांधी यांचा सहभाग आहे. (पान २ वर..)

### पनवेल-कर्जत दुहेरी रेल्वेमार्गाचे काम प्रगतिपथावर

# वावर्ले येथे साकारतोय मुंबई विभागातील सर्वांत लांब बोगदा



**कर्जत : प्रतिनिधी**

पनवेल-कर्जत रेल्वेमार्गावर नवी दुहेरी मार्गिका टाकण्याचे काम केले जात आहे. या मार्गावर कर्जत ते वावर्लेदरम्यान उभारला जात असलेला बोगदा मुंबई उपनगरीय रेल्वेमार्गावरील सर्वाधिक लांबीचा बोगदा असल्याचे सांगण्यात येत आहे.

याआधी २००५मध्ये पनवेल-कर्जतदरम्यान एकेरी मार्गिका टाकण्यात आली होती. त्या मार्गिकेतील वावर्ले ते हालिवली बोगद्यात तांत्रिक अडचणींमुळे उपनगरीय लोकल गाड्या चालविल्या जात नाहीत. त्या वेळी बनविण्यात आलेला मार्ग हा एकेरी असल्याने वाहतुकीस फायद्याचा नव्हता. त्यामुळे मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून पनवेल-कर्जतदरम्यान दुहेरी मार्गिका टाकण्याचे काम सुरू आहे. या नवीन मार्गामुळे कल्याणमार्गे कर्जतला जाण्याच्या तुलनेत या मार्गावरून वेळेची बचत होणार आहे. या मार्गामुळे पनवेल व कर्जत या शहरांचा वेगवान विकास होईल, असे एमआरव्हीसीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सुभाषचंद गुप्ता यांनी सांगितले.

एमआरव्हीसीच्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प तीन (एमयूटीपी-३) अंतर्गत पनवेल-कर्जत लोकल आकारास येत आहे. या रेल्वेमार्गावर नढाळ, किरवली आणि वावर्ले असे तीन बोगदे उभारण्यात येणार आहेत. यापैकी वावर्ले बोगदा २६०० मीटर लांबीचा आहे. नढाळची लांबी २१९ मीटर आणि किरवलीची लांबी ३०० मीटर आहे. वावर्ले बोगदा पूर्ण झाल्यावर हा मुंबई उपनगरीय रेल्वेमार्गावरील सर्वाधिक लांबीचा बोगदा ठरणार आहे. सध्या मध्य रेल्वेवरील वापरात असलेल्या पारसिक बोगद्याच्या तुलनेत हा बोगदा दुपटीने लांब आहे. (पान २ वर..)

**प्रकल्प दृष्टिक्षेपात**
- खर्च : २, ७८२ कोटी रुपये
- स्थानके : ५ (पनवेल, चिखले, मोहपे, चौक, कर्जत)
- रेल्वे मार्गिकेची एकूण लांबी : ३० किलोमीटर
- बोगदे : ३
- उड्डाणपूल : २



# सावरोलीजवळ गेल कंपनीसमोर आगीचे रौद्ररूप

## उच्च दाबाच्या लाईनमुळे स्फोटाचे धमाके : आग आटोक्यात आणताना दमछाक

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेला खालापूर-पेण जोडरस्त्यावरील सावरोली गावाशेजारील इंडिया बुल्स प्रकल्पाच्या आणि गेल कंपनीच्या सबस्टेशन जवळील सुकलेल्या मोकळ्या रानमाळावर शनिवारी दुपारच्या सुमारास अचानक आग लागली. वणवा इतका भयानक होता की आगीचा भडका वाढत होता. तर उच्च दाबाच्या लाईन असल्याने अधून मधून स्फोट होत होते. गॅस वाहून नेणाऱ्या गेल कंपनीच्या लाईन व मुख्य व सबस्टेशन असल्याने या ठिकाणी परिस्थिती चिंताजनक झाली होती. त्यामुळे ही आग अटोक्यात आणण्यासाठी परिसरातील कंपन्यांतील फायर ब्रिगेडच्या वाहनांना पाचारण करण्यात आले होते. भीषण आग विझवित असताना अग्निशमन दलाचे जवान, अपघातग्रस्त टिमचे सदस्यांना धुरांमुळे खोकला, दम कोंडत होता मात्र जिवाची पर्वा न करता तीन तासांच्या मेहनतीनंतर आग विझविण्यासाठी मोठे यश मिळाले आहे.



गेल कंपनीच्या सब स्टेशनच्या बाजूला मोकळे रान असल्याने मोठ्याप्रमाणात गवत वाढले असून या सुकलेल्या गवताचा अज्ञातांच्या कृत्यामुळे आग लागली होती या आगीमुळे मोठ्याप्रमाणात भडका उडत असल्याने धुराचे लोट सर्वत्र पसरले होते ही आग विजविण्यासाठी खोपोली फायर ब्रिगेड, देवदूत यंत्रणा खालापूर टीम, उत्तम स्टीलचे फायर ब्रिगेड, टाटा स्टीलची फायर ब्रिगेड च्या वाहनांतून पाण्याच्या फवाऱ्या मुळे आगीची तीव्रता कमी करण्यात यश मिळाले आणि अपघातग्रास्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेची टीम जवळजवळ तीन तास प्रयत्न करत होते या घटने गांभीर्य लक्षात घेत खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी, खालापूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी सर्व यंत्रणांचे नियोजन करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

खालापूर तालुका पोलीस स्टेशनची सर्व टीम आणि खालापूर तहसील कार्यालयाचे सर्व कर्मचारी, नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी मदत कार्यात सहभाग घेतला.त्यामुळे तीन तासांनंतर ही आग आटोक्यात आणण्यात यश मिळविले.

## रोहा कोलाडजवळ अपघात; दुचाकीचालक जागीच ठार

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा-कोलाड मार्गावर दोन वाहनांमध्ये समोरासमोर झालेल्या अपघातात दुचाकीचालकाला जीव गमवावा लागल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवारी सायंकाळी रामदास महादेव नाळे (वय ४८, रा. विष्णूनगर, धाटाव) हे त्यांच्या ताब्यातील पशन प्रो मो. सा.नं. एम एच ०६ बी टी ४६७६ कोलाड बाजूकडून रोहा बाजूकडे खैरवाडी धाटाव येथे जात असताना पाले खुर्द हद्दीतील पाले बस स्टॉप थोडे पुढे आले असता रोहा बाजूकडून कोलाडकडे जाणाऱ्या कार क्रमांक एम एच ०६ सीडी २५८७ यावरील चालक यांनी त्याचे ताब्यातील कार अतिवेगाने मोटार सायकलला समोरून जोरदार ठोकर मारुन अपघात केला. या अपघातात मोटर सायकल स्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली.

याबाबत अज्ञात आरोपी याची इको कार क्र. एम एच ०६ सीडी २५८७ ही गाडी जप्त करण्यात आली असुन अपघातास कारणीभूत असलेल्या अज्ञात चालक फरार आहे. संबधीत चालक आरोपीवर ३०४(अ) २७९, ३३७, ३३८ मोका १८४, १३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताचा पुढील तपास कोलाड सहा. पोलीस अनिल घायवट यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपासपोलीस हवालदार वसंत दामा शिद करीत आहेत.

# आगामी निवडणुकीत आम्ही महत्त्वाची भूमिका बजावणार : कृष्णा कोबनाक

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

भाजपची कोकण विकास आघाडी मुंबई आगामी निवडणुकीत संघटना वाढीसाठी महत्वाची भूमिका बजावणार आहे, अशी माहिती कोकण विकास आघाडीचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख कृष्णा कोबनाक यांनी दादर येथील आयोजित बैठकीत दिली.



रायगड जिल्ह्यातील मुंबई निवासी पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक बुधवारी (दि. २२) जिल्हा संपर्क प्रमुख कृष्णा कोबनाक यांच्या उपस्थितीत भाजपा कार्यालय दादर येथे पार पडली.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यकर्त्यांना संबोधित करताना कृष्णा कोबनाक म्हणाले, रायगड जिल्ह्यातील विकास जलदगतीने करण्यासाठी शासकीय यंत्रणेने काम करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे समन्वय ठेवणे गरजेचे आहे. पनवेल ते इंदापूर राष्ट्रीय महामार्ग लवकरच पूर्ण करण्यासाठी शासनाने पुढाकार घेऊन हा ज्वलंत प्रश्न मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घ्यावा. पनवेल ते वीर व्हाया माणगांव लोकल रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत लवकरच आमच्या प्रयत्नांना यश मिळेल. माणगांव येथे सुपर स्पेशालिटी रुग्णयालय उभारण्यात आले पाहिजे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्रभूषण नानासाहेब धर्माधिकारी यांच्या अभिनंदनाचा ठराव या बैठकीत घेण्यात आला.

मुंबई वासीयांना संघटित करण्यासाठी व आगामी काळात महानगपालिका, जिल्हा परिषद, लोकसभा, विधानसभा, निवडणुकीत सक्रिय सहभाग घेऊन भारतीय जनता पक्ष मजबूत करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनासूचना दिल्या आहेत.

या बैठकीला कोकण विकास आघाडीचे सरचिटणीस संजय सुर्वे, जिल्हा सहसंपर्क प्रमुखशुभांगी सुर्वे, मदन वाजे, गोविंद भायदे, तालुका संपर्क प्रमुख रघुनाथ भायदे, संतोष फीलसे, कृष्णा कीजले, हेमंत रामाणे, प्रदीप साळवी, आदीती मोरे, राजेंद्र केळूस्कर व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# आमदार निधी शाळा आणि शैक्षणिक संस्थांनाच दिला जाणार -ज्ञानेश्वर म्हात्रे

**कर्जत : प्रतिनिधी**

मी आमदार झाल्याचा आनंद माझ्यापेक्षा माझ्या शिक्षकांना झाला आहे यातच आनंद आहे. यापूर्वीचे आमदार असलेल्या शिक्षक आमदारांनी काय केले? हे बोलायला नको. शिक्षक मागील सहा वर्षे पोरका झाला होता आणि त्यामुळे पराभव होऊन देखील शिक्षकांसाठी काम करीत राहिलो. मी शिक्षकांचा खास ऋणी आहे. कारण कोकणातील तब्बल ३३ शिक्षक संघटनांनी मला पाठिंबा दिला होता. त्यात मागील सहा वर्षे केलेल्या कामाचा फायदा आपल्याला मतदानातून दिसून आला. मला तुम्ही पहिल्या फेरीत निवडून दिले. ज्ञानेश्वर म्हात्रे हा पूर्वीचा जसा होते तसाच राहणार आहे. शिक्षकांचा आमदार झालो असलो तरी निवडून देणारे सर्व शिक्षक हेच आमदार आहेत असे जाहीर करीत आपला आमदार निधी हा कोकण विभागातील सहा जिल्ह्यात फक्त शैक्षणिक संस्था आणि शाळांच्या विकास कामांसाठी खर्च केला जाणार असे यावेळी शिक्षक आमदार द्यानेश्वर म्हात्रे यांनी यावेळी जाहीर केले.



शिक्षक सेनेच्यावतीने कोकण शिक्षक मतदासंघाचे नवनियुक्त आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचा सत्कार सोहळा नेरळ येथील मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला विद्या मंदिर मंडळाचे संयुक्त सचिव विवेक पोतदार, विद्या मंदिर मंडळ संस्थेचे विश्वस्त डॉ मिलिंद पोतदार, भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्षा मंगेश म्हसकर, कर्जत तालुका पंचायत समिती उप सभापती मनोहर थोरवे, नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक पी बी विचवे, टिपणीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नंदकुमार इंगळे, किरण ठाकरे, कर्जत पंचायत समितीचे माजी सदस्य नरेश मसणे, शिवसेनेचे तालुका सचिव अंकुश दाभणे, माजी मुख्याध्यापक कमलाकर वारे आदी उपस्थित होते.

### शिक्षकांच्या प्रश्नांसाठी प्रयत्नशील!

*ज्ञानेश्वर म्हात्रे पुढे म्हणाले, यापूर्वी कामे केली असून उरलेले सर्व प्रश्न एक दीड वर्षात सोडवून ते संपवून टाकायचे आहेत. पेन्शनसाठी आम्ही आंदोलने केली आहेत आणि त्यामुळे इतरांचे टेन्शन वाढले होते पण मला त्याचे टेन्शन नव्हते कारण शिक्षक माझ्यासोबत होते आणि म्हणून शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अर्थ संकल्पिय अधिवेशनात मांडणार आहोत. तसेच पेन्शनचा विषय आणि विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाचे पुस्तक याबाबतचे प्रश्न विधिमंडळाकडे पाठवला आहे. त्यात राज्यातील सात पैकी तीनच आमदार शिक्षक आहेत. त्यातील चार आमदारांची उणीव भरून काढायची आहे असे स्पष्ट केले.*

यावेळी शिवसेनेचे उप तालुका प्रमुख ... यांची उपस्थिती: यावेळी... 

यावेळी शिवसेनेचे उप तालुका प्रमुख अंकुश शेळके, नेरळ शहर संपर्क प्रमुख किसन शिंदे, भाजप तालुका उपाध्यक्ष श्रीकृष्ण डुकरे, ज्ञानेश्वर भगत, डीएड कॉलेजचे प्राचार्य डॉ उत्तम तरे, दिनेश कालेकर, दत्ता ठमके, संतोष कांबरी, हनुमंत भगत, जयवंत पारधी यांयांच्यासह कर्जत तालुक्यातील शिक्षक उपस्थित होते.

यावेळी यावेळी

# गुळसुंदेत कृषी विभागातर्फे विविध उपक्रम

**रसायनी : प्रतिनिधी**

पनवेल तालुका कृषी विभाग तसेच पंचायत समिती पनवेल आंतर्गत शेतकऱ्यांसाठी चालु वर्षांत अनेक योजना राबविल्या गेल्या. यामध्ये खालील लाभार्थी व योजनांचा समावेश आहे. काही योजना पूर्णत्वास गेल्या असुन, काही पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. कृषी विभागामार्फत आकुलवाडी, गुळसुंदे व लाडावली या गावातील शेतकऱ्यांना तूर, हरभरा, चवळी इ. बियाणांचे वाटप करण्यात आले. यासोबतच गुळसुंदे येथील दोन शेतकर्याना ट्रॅक्टर साठी १२५००० रुपये प्रत्येकी अनुदान प्राप्त झाले.



एम.आर.इ.जी.एस.आंतर्गत गुळसुंदे येथील दोन शेतकर्यानी फळ झाडे लागवडीचा लाभ घेतला. आकुलवाडी येथील जवळपास २५ अदीवासी बांधवांसाठी भाजी चे बीयाणे देण्यात आले. पंचायत समीती व जिल्हा परिषद सेज फंड आंतर्गत गुळसुंदे येथील तीन शेतकरी ब्रश कटर, ताडपत्री तसेच विहीरसाठी अनुदानास पात्र झाले आहेत तर आकुलवाडी येथील एक शेतकरी पंचायत समिती पशुविभाग आंतर्गत म्हशींसाठी अनुदानास पात्र झाला आहे.

पी.एम.कीसान योजनेतील लाभार्थीसाठी गुळसुंदे येथे इ. के. वाय.सी.चा कॅम्प आयोजित करण्यात आला होता. ज्यामध्ये शंभरहुन अधिक लाभार्थींनी सहभाग नोंदविला. पनवेल तालुक्यात कृषी विभागामार्फत धान्य महोत्सव व कृषी प्रदर्शन व विक्री याचे आयोजन करण्यात आले व शेतकऱ्यांसांठी विविध विषयांवर व्याख्याने व चर्चा सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास ४० परदेशी पाहुण्यांनी पीक स्पर्धेतील भाताच्या पिकांची पाहणी करुन पारंपारिक तंत्राचा अभ्यास केला. पनवेल तालुका कृषी अधीकारी श्री. गीते, प्रसाद पाटील, श्री. दोलताडे तसेच पंचायत समिती पशु विभाग आजगावकर व कृषी विभाग मुकेश कांबळे तसेच गुळसुंदे ग्रामविकास अधिकारी श्री. दासगावकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कृषीभुषण व शेतकरी सन्मान कक्ष सदस्य मीनेश गाडगीळ यानी या योजना वरील विभागात राबविण्यासाठी पाठपुरावा केला. या योजना राबविताना रायगड जिल्हा कृषीअधिक्षक उज्वला बानखेले व पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रशासकीय अधिकारी व प्रगतशील शेतकरी यांच्यातील परस्परसमन्वयातुन परिसरातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत ही योजना पोचविण्याचे काम यापुढेही चालु राहील, असा विश्वास मीनेश गाडगीळ यांनी व्यक्त केला.

## ताम्हाणे मंदिरातील दानपेटीची चोरी

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील ताम्हाणे गावातील मंदिराची दानपेटी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. या प्रकरणी महाड तालुका पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

महाड तालुका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ताम्हाणे गावातील मंदिरामध्ये दिनांक २५/१२/२०२२ ते २६/१२/२०२३ या दरम्यान मंदिरातील कडी कोयंडा तोडून मंदिरातील दानपेटी चोरून नेली आहे. दानपेटीत अंदाजे १५०० रुपये चोरीला गेले आहेत.

या प्रकरणी मंदिराचे ट्रस्टी दत्तात्रय उर्फ बापू बाबुराव दळवी यांनी महाड तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

यानुसार महाड तालुका पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# पनवेल पोस्ट ऑफिस येथे १५ मार्चला पहिली डाक अदालत

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल पोस्टमास्टर जनरल, नवी मुंबई क्षेत्र, पनवेल यांच्या वतीने १५ मार्च २०२३ रोजी पनवेल मुख्य डाकघर, दुसरा मजला येथे पहिली डाक अदालत आयोजित केली आहे.

मालेगाव, नाशिक, नवी मुंबई, पालघर, रायगड, ठाणे विभागांच्या डाक सेवांशी संबंधित पोस्टाच्या सेवेविषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल, अशा तक्रारींची या डाक अदालतीमध्ये दखल घेतली जाईल. विशेषतः टपाल वस्तू, मनी ऑर्डर, बचत बँक खाते, प्रमाणपत्र इत्यादी बाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारींचा उल्लेख सर्व तपशिलासह केलेला असावा देशामधील पोस्टाच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण केले आहे. मात्र, तरीही सेवेमधील काही त्रुटीमुळे असे काही प्रसंग निर्माण होतात की, त्यामुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार करण्याची वेळ येते. या तक्रारींचा न्याय निवाडा करण्यासाठी पोस्ट खात्याने वेळोवेळी डाक अदालत घेण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार सोडविण्याचा प्रयत्न करणार आहेत.


ॲड. विशाल व्ही. जाजु
मे. मुजावर सो. कोर्टात

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश, वरीष्ठ स्तर यांचे कोर्टात.**

दि. चौ. अर्ज क्र १०६४/२०१९
नि. १७/ड
ने.ता. ०८/०३/२०२३

**१. खातीजा बी करम खान**
सज्ञान, भारतीय रहिवाशी,
घर क्र. ५०७, ए विंग,
रझा सी. एच. एस., शिवडी
(पश्चिम) मुंबई - ४०००१५

**२) करम ताजमहमद खान उर्फ**
करम ताज मोहम्मद खान
सज्ञान, भारतीय रहिवाशी,
घर क्र. ५०७, ए विंग, रझा सी. एच. एस.,
शिवडी (पश्चिम)मुंबई - ४०००१५ } अर्जदार

**विरूध्द**
शबाना खान
सज्ञान, भारतीय रहिवाशी,
घर क्र. ५०७, ए विंग,
रझा सी. एच. एस., शिवडी (पश्चिम)...... विरुद्धपक्ष
मुंबई - ४०००१५

**जाहीर नोटीस**

**१. ज्याअथी मोहम्मद नसीब करम खान,** रा. सज्ञान, भारतीय रहिवाशी, घर क्र. ५०७, ए विंग, रझा सी. एच. एस., शिवडी (पश्चिम) मुंबई- ४०० ०१५ ह्यांचे दिनांक २४/१०/२०१८ रोजी पाचगणी येथे निधन झालेले आहे आणि सदर मोहम्मद नसीब करम खान, यांची आई **खातीजा बी करम खान** व वडील **करम ताजमहमद खान** उर्फ **करम ताज मोहम्मद खान** सज्ञान, भारतीय रहिवाशी घर क्र. ५०७, ए विंग, रझा सी. एच. एस., शिवडी (पश्चिम) मुंबई- ४०० ०१५ यांनी सदर कोटीत सदरहू मयत मोहम्मद नसीब करम

खान,,यांच्या खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे वारस सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे, ज्याअर्थी सदरहू अर्जदार **खातीजा बी करम खान व करम ताजमहमद खान** उर्फ **करम ताज मोहम्मद खान** यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल त्यांनी ह्या जाहिरनोटीशी तारखेपासून एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत **मोहम्मद नसीब करम खान,** यांचे वारसांचे सर्टिफिकेट देईल, तारीख २१/१२/२०२२. माहे डिसेंबर सन २०२२.

**मिळकतीचे वर्णन**

घर क्र.७०३, सातवा माळा, नवरंग रेसिडेन्सी, क्षेत्रफळ ५१८.९५४ चौरस फुट फ्लॉवर बेड क्षेत्र ६३ चौरस फुट टेरेस क्षेत्र ४५९ चौरस फुट, प्लॉट क्र. १६, सेक्टर-२, तळोजा पंचानंद, तालुका पनवेल जिल्हा रायगड, महाराष्ट्र.

सही/-
क. लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, पनवेल


पान १ वरुन

## पनवेलमध्ये आज ‘माय बोली साजिरी’

आजच्या मॉडर्न पिढीसाठी आणि त्यांच्यावर माय मराठी अर्थात माझ्या मराठीचे संस्कार करणाऱ्या आधीच्या पिढीसाठीही हा कार्यक्रम पर्वणी आहे. त्या अनुषंगाने या कार्यक्रमाच्या मोफत प्रवेशिकेसाठी ९०२९५८०३४३ किंवा ९८७०११६९६४ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## वावर्ले येथे साकारतोय मुंबई विभागातील सर्वांत लांब बोगदा


पनवेल-कर्जत रेल्वेमार्गावर नढाळ, किरवली आणि वावर्ले असे तीन बोगदे उभारण्यात येणार आहेत. यापैकी वावर्ले बोगदा २६०० मीटर लांबीचा आहे. नढाळची लांबी २१९ मीटर आणि किरवलीची लांबी ३०० मीटर आहे. बोगद्यांव्यतिरिक्त या मार्गावर दोन उड्डाणपूल उभारण्यात येणार असून कर्जतजवळील उड्डाणपूल १,२२५ मीटर आणि पनवेललगतचा १,३७५ मीटरचा आहे. मार्च २०२५पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये राजभाषा महोत्सवाला प्रारंभ

**पनवेल : वार्ताहर**

मराठी माणूस नाट्यवेडा आहे. इतर रंगभूमींवर नाटक हे फक्त रंजन किंवा वेळ घालवायचं साधन म्हणून पाहिलं जातं पण मराठी प्रेक्षक नाटक ही पर्वणी म्हणून पाहायला जातो. पोटाला चिमटा काढतील, पदरमोड करतील, पण मराठी नाटकं गांभीर्याने पाहतील असे मत प्रसिध्द मराठी दिग्दर्शक केदार शिंदे यांनी व्यक्त केले. ते पनवेल शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आयोजित राजभाषा महोत्सव अंतर्गत मराठी नाटक व सिनेमा भविष्यातील आव्हानं यावरील चर्चासत्रात बोलत होते.

या चर्चासत्रात प्रसिद्ध दिग्दर्शक अभिजित पानसे, केदार शिंदे, अभिनेते पुष्कर श्रोत्री, संतोष जुवेकर यांनीही सहभाग घेतला



पनवेल शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे राजभाषा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. २२ ते २७ फेब्रुवारी असे पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवातील दि. बा. पाटील पुस्तकनगरी या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन मनसेचे सरचिटणीस मनोज चव्हाण यांच्या हस्ते पार पडले. विरुपाक्ष सभागृहाशेजारील मैदानात हे प्रदर्शन नागरिकांसाठी भरवण्यात आले आहे. यावेळी मनसेचे शहराध्यक्ष योगेश चिले, केसरीनाथ पाटील, रामदास पाटील व इतर पदाधिकारी उपस्थित होते. या राजभाषा महोत्सवात व्याख्यान, चर्चासत्र, परिसंवाद, काव्य मैफल विविध कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

या महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच सोमवारी राज ठाकरे यांची मुलाखतीचा कार्यक्रम पनवेल शहरातील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडणार आहे. राज ठाकरे हे काय वाचतात या विषयावर ही मुलाखत घेतली जाणार आहे.

## निवडक

### लोकलमधून पडून महिलेचा मृत्यू

**पनवेल :** खांदेश्वर ते पनवेल रेल्वे स्टेशनदरम्यान लोकलमधून पडून एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या महिलेच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. अनोळखी महिलेचे अंदाजे वय ५५ वर्षे असून उंची पाच फूट एक इंच, अंगाने मध्यम, नाक सरळ, डोक्याचे केस वाढलेले काळे पांढरे, डोळे काळे तसेच अंगात पिवळी, निळी साडी आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२२७४६७१२२) किंवा सहा पोलीस उप निरिक्षक आर. एस. हाके (९४९४९१२२९४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मालगाडीखाली तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** येथील रेल्वेस्थानकावर मालगाडीखाली येऊन एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. पनवेल रेल्वे पोलीस या तरुणाच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. तरुणाचे अंदाजे वय ३० वर्षे असून उंची चार फूट चार इंच, अंगाने सडपातळ, रंगाने काळा-सावळा, चेहरा उभट, नाक सरळ तर उजव्या हातावर कोपऱ्याच्या खाली इंग्रजीमध्ये SAURABH असे गोंदलेले आहे. तसेच अंगात निळ्या व पांढऱ्या चेक्सचा शर्ट व काळी पॅन्ट आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस किंवा पोलीस हवालादार एस. सी. इंगवले (९४९४९१२२९४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### लोकलमध्ये आढळला मृतदेह


**पनवेल :** बेलापुर रेल्वे स्टेशनवर आलेल्या पनवेल-वडाळा लोकलमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस घेत आहे. या मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४३ वर्षे, उंची चार फूट १० इंच, अंगाने सडपातळ, रंगाने काळा सावळा, चेहरा उभट, नाक सरळ, दात-शाबुत असून अंगात काळा व हिरवा शर्ट व काळी फुल पॅन्ट घातलेली आहे. या मयत व्यक्तीचे अद्याप कोणीही वारस मिळून आलेले नाही. त्यामुळे या व्यक्तीबाबत काही माहिती उपलब्ध असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक डी. एस. बदाले (९५९४९१२२९४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**रसायनी : रोटरी या संस्थेला ११८ वर्षे झाल्याने रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाच्या विशेष सभेचे गुरुवारी आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपस्थितांनी केक कापून रोटरीचा वाढदिवस साजरा केला.** (छाया : बी. एस. कुलकर्णी)

# रसायनीत साथीच्या आजारांमध्ये वाढ

## वातावरणातील बदलामुळे अनेकांना सर्दी-खोकला



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून सततच्या बदलत्या वातावरणामुळे नागरिकांना साथीच्या रोगांचा त्रास जाणवू लागला आहे. ताप, थंडी, सर्दी, कोरडा खोकला यांसारख्या साथीच्या आजारांचा रुग्णांना विळखा बसला आहे.

जिल्ह्यातील विविध शासकीय व खासगी रुग्णालयांत ताप, सर्दी, कोरड्या खोकल्याचे शेकडो रुग्ण दाखल झाले आहेत. विविध शासकीय व खासगी रुग्णालयांत अशा साथीच्या आजारांनी त्रस्त असलेले अनेक रुग्ण उपचारासाठी दाखल होत आहेत. उपचार करून घेण्यासाठी रुग्णांची गर्दी वाढू लागली आहे. मागील १५ दिवसांपासून सुरू झालेला ऊन व थंडीचा खेळ नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करणारा ठरला आहे. जुजबी औषधांनी अंगावर काढल्यानंतर तापाचे प्रमाण वाढत असल्याचे लक्षात येत आहे. शरीरातील पांढऱ्या पेशींचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येत आहे. रुग्णालयांमध्ये दाखल झालेल्या बहुतांशी रुग्णांत मलेरिया, डेंग्यू यांचेही रुग्ण असल्याने रक्त तपासणी मोठ्या प्रमाणात केली जात आहे. खासगी रक्ततपासणी केंद्रांवर त्यामुळे रुग्णांची रक्ततपासणी नमुने देण्यास एकच गर्दी होत आहे.

# खारघरमध्ये अनधिकृत पार्किंग

## रेल्वे स्टेशन परिसरात १०५ जणांवर कारवाई

**खारघर : प्रतिनिधी,**
**पनवेल : वार्ताहर**

खारघर रेल्वेस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत पार्किंग रस्त्याच्या दुतर्फा केली जाते. गुरुवारी (दि.२३) खारघर वाहतुक शाखा आणि वाहतूक पोलीस उपायुक्त यांच्या पथकाने केलेल्या कारवाईत १०५ जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

विशेष मोहीम राबवत ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती खारघर वाहतुक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश गावडे यांनी दिली. खारघर रेल्वे स्थानकापासुन सेक्टर ८ मध्ये रस्त्याच्या दुतर्फा सध्याच्या घडीला मोठ्या प्रमाणात चारचाकी वाहने अनधिकृत पार्क केली जात आहेत. वाहतूक पोलिसांनी केलेल्या कारवाईत हजारो रुपयांचा दंड जमा झाला आहे. ई-चलनद्वारे ही कारवाई करण्यात आली.




**चौक : रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांच्या लग्नाचा ५०वा वाढदिवस शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्त भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत व उपाध्यक्ष संजय पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.**

## मालधक्का येथे एकाची आत्महत्या

**पनवेल :** रेल्वे स्टेशन परिसरातील मालधक्का रोडजवळील झाडाला कोणत्यातरी अज्ञात कारणावरून झाडाच्या फांदीला केबलच्या वायरने बांधून एका व्यक्तीने गळफास घेतल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शहर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० वर्ष, रंग सावळा, उंची पाच फुट सात इंच, डोक्यास वाढलेले काळे केस, चेहरा उभट, अंगात पांढरा-निळा टी शर्ट, त्याच्या डाव्या बाजुस एफआर. एन्जल मल्टिपरपस स्कूल अंबरनाथ, ऑलवेज एक्सलेन्स अशा अक्षराचा लोगो असलेला, तसेच छातीवर एम. एस. असे गोंदलेले आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरिक्षक गणेश फरताडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## खारघरमध्ये अनधिकृत खोदकामाचे साहित्य जप्त



**खारघर : प्रतिनिधी**

खारघर शहरात सेक्टर ३४, ३५ परिसरात गुरुवारी रात्री केबल टाकण्यासाठी अनधिकृत खोदकाम केले जात असल्याचे निष्पन्न झाले. याबाबत पनवेल महापालिका आयुक्तांकडे तक्रार केल्यावर रात्रीच काम थांबवुन पालिका प्रशासनाने साहित्य जप्त केले आहे.

या परिसरात महानगर गॅसच्या माध्यमातून खोदकाम सुरू आहे, मात्र सायंकाळी महानगर गॅस प्रशासनाचे काम थांबल्यानंतर याच ठिकाणी चार कामगार कुदळ, फावड्याच्या सहाय्याने खोदकाम करत असल्याची बाब निदर्शनास आली. चौकशी केल्यावर कोणत्याही प्रकारचे समाधानकारक उत्तर या कामगारांकडून मिळू शकले नसल्याने पवार यांनी ही बाब थेट पालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या निदर्शनास आणुन दिली. पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी तत्परतेने प्रभाग अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठवले. पालिकेच्या पथकाने हे काम थांबवत खोदकाम करणारे साहित्य जप्त केले आहे.

खारघर शहरात अनेक सेक्टर मध्ये रात्रीच्या वेळेला अशाप्रकारे कोणतीही परवानगी न घेता केबल टाकण्याचे काम हाती घेतले जाते. याकरिता रात्रीच्या वेळेची निवड केली जाते. पालिकेने नव्याने डांबरीकरण केलेले रस्तेदेखील याकरिता खोदण्यात येत आहेत.

# परेश ठाकूर यांच्यातर्फे न्हावे विद्यालयास स्मार्ट टीव्ही भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूल या विद्यालयास रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य परेश ठाकूर यांचे तर्फे स्मार्ट डिजिटल टीव्ही भेट देण्यात आला.

विद्यालयास डिजिटल स्मार्ट टी.व्ही. देण्याची घोषणा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य परेश ठाकूर यांनी विद्यालयाच्या शाळा सुधार अर्थात शाळा मूल्यांकन समितीचे चेअरमन म्हणून ते पथक पर्यवेक्षणामध्ये सहभागी झाले होते तेव्हा केली होती. पथक पर्यवेक्षणामध्ये सहभागी झाल्यानंतर विद्यालयात बोलताना परेश ठाकूर यांनी न्हावे विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण अध्ययन वृद्धीसाठी स्मार्ट डिजिटल टीव्ही देण्याचे जाहीर केले होते.

परेश ठाकूर यांनी या पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे एका समारंभात विद्यालयास स्मार्ट डिजिटल टी.व्ही. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व माजी सचिव तथा पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी यांच्याकडे त्यांनी हा स्मार्ट डिजिटल टी.व्ही. संच सुपूर्द केला. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत भोईर, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महात्मा फुले कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतचे सरपंच व स्कूल कमिटी सदस्य हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच प्रल्हाद पाटील, ज्येष्ठ स्कूल कमिटी सदस्य किसन पाटील व ग्राम सुधारणा मंडळाचे अध्यक्ष शैलेश पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद कोळी, संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले व उपशिक्षक देवेंद्र म्हात्रे आदी उपस्थित होते.

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून

# विचुंबेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल तालुक्यातील विचुंबे येथे भारतीय जनता पक्ष रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा येथे पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप शनिवारी (दि. २५) करण्यात आले. विचुंबे ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

विचुंबे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना कंपास पेटी, मुलींसाठी रिबीन, बेल्ट, टाय यांच्यासह इतर वस्तूंचे वाटप करण्यात आले. या वेळी, सदस्य भाई भोईर, किशोर सुरते, नितीन भोईर, अविनाश गायकवाड, अमिता म्हात्रे, अक्षता गायकवाड, संगीता भोईर, नविता भोईर, संगीता सुरते, अनिता भगत, एकनाथ भोईर, रामदास गायकवाड, नयन भोईर, बळीराम भिंगारकर, प्रेम भिंगारकर, भगवान भोईर, मोहन तुपे, संजय भोईर, विनोद भोईर, पुरुषोत्तम भोईर, अनंता गायकवाड, धनंजय भोईर, मोरेश्वर भोईर, धुळीराम भिंगारकर, संजीत भिंगारकर, दशरथ भिंगारकर, विश्वनाथ सुरते यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ‘टेक्नो ब्रिन्क’

**खारघर : रामप्रहर वृत्त**




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत २३ ते २५ फेब्रुवारीदरम्यान ’टेक्नो ब्रिन्क’च्या माध्यमातून वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या टेक्नो ब्रिन्कचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना आजच्या आधुनिक युगामध्ये वेगवेगळ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व माहिती व्हावी हा होता. या टेक्नो ब्रिन्कच्या माध्यमातून ह्या तीन दिवसांमध्ये वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने टेक-रांगोळी, रिल्स, बी. जी. एम. आय, एन. एफ. एस, वादविवाद, कोडवार व प्रश्नमंजुषा, ऑनलाइन क्यूज, पी.पी.टी, ट्रेझर हंट व वेब डिझायनिंग. या स्पर्धांमध्ये रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील तसेच उच्च माध्यमिक महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभागी झाले होते.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड, माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा. रश्मी पाटील, प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) या सर्वांनी सर्व स्पर्धकांचे अभिनंदन केले. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागातील प्रा. मीनल मांडवे, प्रा. महेश धायगुडे, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. गायत्री काळे, प्रा. प्रेरणा सातव, प्रा. स्नेहा लोखंडे, दीपक पवार, अनंत सावंत व माहिती व तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी तसेच शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी मेहनत घेऊन सर्व स्पर्धा यशस्वीरित्या झाल्या.

## स्त्रियांच्या उद्योजक विकासासाठी योग्य दिशा गरजेची -योगिता भगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड सेक्टर १७ येथे मोनिका गुलाब सिंह तंवर यांनी नव्याने निर्माण केलेला एस.एस. साडी सेंटरचे उद्घाटन गव्हाण ग्रामपंचायतच्या सदस्य तसेच भाजप महिला मोर्चा उलवे नोड-२च्या अध्यक्ष योगिता सुहास भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले आणि स्त्रियांच्या उद्योजक विकासासाठी योग्य दिशा मिळावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले पाहिजेत असे सांगितले.

या कार्यक्रमाला माजी जि. प सदस्य रवींद्र पाटील व वहाळच्या साई मंदिरचे विश्वस्त रविशेठ पाटील उपस्थित होते तसेच उलवे व्यापारी असोसिएशनचे विक्रम सिंग, नरेंद्र बिश्नोई, कांजीभाई पटेल, पुनाराम देवास, संपत चौधरी, महेंद्रसिंग राव, गुलाबसिंह, बलवंत सिंह तसेच शशिकांत ठाकूर, सुहास भगत आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




# कळंबोलीत मराठी भाषा दिन साजरा

## तरुणांनी मराठी भाषेचे जतन करावे -डॉ. समिधा गांधी

**पनवेल : वार्ताहर**



कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखा व शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे मराठी भाषा दिन व वार्षिक बक्षीस वितरण समारंभ कळंबोली येथे झाला. या वेळी डॉ. समिधा गांधी यांनी मराठी भाषेला हजारो वर्षांचा वारसा आहे. हा वारसा जतन करण्याचे काम तरुण पिढीने करावे, असे आवाहन केले.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रीती महाजन उपस्थित होत्या, तर या समारंभास महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाचे सदस्य, कोमसापचे संपर्कप्रमुख प्रा. एल. बी. पाटील, नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, सुधागड एज्युकेशन सोसायटीचे संचालक प्राचार्य राजेंद्र पालवे, दर्शना आंग्रे, ज्योत्स्ना राजपूत, रामदास गायधने उपस्थित होते. या वेळी महाविद्यालयाच्या विविध स्पर्धांमध्ये विजयी व विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्रा. एल. बी. पाटील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मराठी भाषेची संस्कृती जपली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. गणेश कोळी यांनी मराठी भाषेतील अनेक विपुल साहित्य आज उपलब्ध आहे त्यामुळे महाविद्यालयीन तरुणांनी त्याचं मनोमन वाचन करावे, असे सांगितले. प्राचार्य डॉ. प्रीती महाजन यांनी मराठी भाषा दिनाचे कार्यक्रम हे तरुण पिढीला निश्चितच प्रेरणादायी ठरतील, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी ज्येष्ठ गझलकार ज्योत्स्ना राजपूत, कवयित्री दर्शना आंग्रे यांनी आपल्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. रमेश जाधवर यांनी केले. सूत्रसंचालन मंजुश्री सुळे हिने केले, तर उपस्थितांचे आभार मराठी विभाग प्रमुख डॉ. मनीषा बनसोडे यांनी मानले.

# बेला बोस... लोकप्रिय गाण्यांनी कायमच लक्षात राहिल



**काळ जस जसा पुढे सरकतो, तसे अनेक चित्रपट आणि त्यातील अनेक कलाकारही मागील पिढीत जात असतात आणि मग एकाद्या लोकप्रिय गाण्याने ते कलाकार व चित्रपट आठवत राहतात आणि अशातच एके दिवशी बातमी येते की, एकद्या जुन्या काळातील कलाकाराचे निधन झाले आणि मग मन फ्लॅशबॅकमध्ये जाते. बेला बोसबद्दल अगदी असेच झाले...**

एकेकाळची रूपेरी पडद्यावरची उत्तम नृत्यांगना, चरित्र अभिनेत्री, कधी विनोदी भूमिका तर कधी नकारात्मक भूमिका साकारलेल्या बेला बोस यांचे २० फेब्रुवारी २०२३ रोजी निधन झाले अशी दुर्दैवी बातमी आली आणि मन भूतकाळात गेले. अगदी ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट अर्थात कृष्ण-धवल चित्रपटाचा काळ आठवला.

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

कोलकाता (तेव्हाचे कलकत्ता) येथे एका सुखासीन बंगाली हिंदू कुटुंबात जन्मलेली, वडील अमूल्य रतन बोस आणि आई लीलावती यांची कनिष्ठ कन्या म्हणजे बेला बोस! त्यांना दोन भाऊ, दोन बहिणी! जन्म १८ एप्रिल १९४१ रोजी झाला. ही बेला बोसची प्राथमिक ओळख. त्यांचे वडील कापड व्यापारी होते. त्यांची आर्थिक आधार ज्या खासगी बँकेत होती त्या बँकेने दिवाळखोरी जाहीर केल्याने हे कुटुंब अडचणीत आले आणि कामधंद्यासाठी १९५१ साली हे कुटुंब कलकत्ता सोडून मुंबईत आले. बेला तेव्हा दहा वर्षांची होती. ते वय फार काही समजणारे नव्हते आणि तो काळही तसा संथ होता.

बेलाजींचे वडील कापड व्यापारात असल्याने मंबईच्या कोहीनूर मिलबरोबर व्यवसाय वाढ अपेक्षित होती. दुर्दैवाने १९५४ साली बेलाजींच्या वडीलांचे अपघाती निधन झाल्यावर आईने कलकत्त्याला परत जायचा विचार केला होता, पण काही नातेवाईकांनी त्यांच्या घरावर कब्जा केल्याने त्यांनी मुंबईत रहायचे ठरवले. आईने नर्सिंगचे शिक्षण पूर्ण करून दक्षिण मुंबईतील सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये नोकरी केली आणि घर आणि मुलांची जबाबदारी सांभाळली.

बेलाजींचे शिक्षण पोतदार हाईस्कूलमध्ये झाले. बेलाजी तेव्हा अंधेरीला सोहराब बाग येथे रहात असत. आणि योगायोग कसा ते बघा. त्या काळी अंधेरीमधले मोहन स्टुडिओ, प्रकाश स्टुडिओ, जवळपास फिल्मालय, नटराज स्टुडिओ असे स्टुडिओज होते. लहानपणी शाळेतून जाता येताना मैत्रिणी बरोबर बेलाजी स्टुडिओत डोकावत आणि हे कळत नकळत पत्थ्यावर पडत राहिले.

सुरुवातीला बेलाजींनी दक्षिणी डान्सिंग स्कूल मध्ये मणीपुरी नृत्याचे प्रशिक्षण घेतले होते.

तिथले गुरुजी फी घेत नसत, मात्र त्या बदल्यात चित्रपटात किंवा ट्रुपमध्ये ग्रुपडान्सर म्हणून विनामूल्य नृत्य करावे लागे. त्या काळात अशा गोष्टी घडत.





डान्सस्कूलमधील तबलामास्टर नबाब अली यांनी कॅमेर्याचे भान ठेवून चित्रपट नृत्याकरता आवश्यक असणारे बारकावे बेलाजींना समजून सांगितले. आणि बेला बोसच्या करीयरची सुरुवात ग्रुपडान्सर म्हणून झाली..पण आव्हाने कायम होती. त्यांच्या जरुरीपेक्षा जास्त उंची आणि बारीक अथवा काटक शरीरयष्टीमुळे नृत्यात पारंगत असूनही खूप वेळा काढून टाकण्यात येई. के. असिफ दिग्दर्शित मुगल ए आझम (१९६०) मधल्या मोहे पनघटपे नंदलाल छेड गयो रे...या नृत्यातल्या कंकरी मोहे मारी गगरिया फोड डाली...या ओळीला वाकताना बेलाजी उंचीमुळे बाकीच्या मुलींपेक्षा वेगळ्या दिसत असल्याने सेटवर हजर सितारादेवी खूप भडकल्या होत्या असा एक किस्सा प्रसिद्ध आहे. या गोष्टी छोट्या वाटतात, पण त्यातून तावूनसुलाखून निघणे आवश्यक असतेच. अशातच एकदा एका नृत्यासाठी बेला बोस ग्रुपडांसची रिहर्सल करत असतानाच दिग्दर्शक नरेश सहगल त्यांच्या समोर उभे होऊन पुढे येण्यासाठी खुणावू लागले. त्यांनी विचारले, सोलो नाचोगी? बेला बोसला हा आश्चर्याचा धक्काच होता. त्या उत्तरल्या, क्यूं नहीं? नरेशजींनी त्यांचे नृत्यकौशल्य जाणले होते. असा दिग्दर्शक हवाच असतो. बेला बोसचा पहिला सोलो डांस अर्थातच एकटीचा नृत्य असलेला चित्रपट होता १९५९ सालचा मैं नशे में हूँ... मुझको यारों माफ करना मैं नशेमें हूँ...या गाण्यात त्यांना राज कपूरबरोबर नृत्य करण्याची संधी मिळाली आणि बेला बोस या नावाची कलाकार चित्रपटसृष्टीला लाभली. असे काही घडावे लागते, असे काही घडणे नशीबात असावे लागते. याचे कारण अर्थातच बेला बोस आता ग्रुपडान्सर म्हणून वाटचाल करीत असतानाच नृत्यातील आणखीन काही प्रकार शिकली आणि चित्रपट या माध्यम व व्यवसायात हळूहळू स्थिर होत गेली. एखाद्या कलाकाराचा असाही प्रवास असू शकतो. महत्त्वाचे आहे ते त्यातून कलाकार कसा घडतो. पन्नासच्या दशकाच्या शेवटी शेवटी बेला बोसने स्वतंत्रपणे नृत्य कारकिर्दीला सुरुवात केली. नृत्याबरोबरच खलनायिका तसेच विनोदी भूमिकासुध्दा



साकारल्या. अनेकदा तरी काही कलाकारांसमोर भूमिका निवडीला फारसा वाव नसतो. आपले अस्तित्व आणि मागणी कायम ठेवण्यासाठी मिळतील त्या भूमिका साकारत साकारत वाटचाल करावी लागते. बेला बोसने ते केले आणि यश संपादन केले. सौतेला भाई चित्रपटात गुरुदत्त आणि प्रणोती घोषबरोबर त्यांची भूमिका होती. शिकार मधली जॉनी वॉकर बरोबरची विनोदी भूमिकाही गाजली. त्यांनी फक्त एका चित्रपटात नायिकेची भूमिका केली तो होता नागिन और सपेरा त्यात मनहर देसाई बेला बोसचे नायक होते. खरं तर एवढ्या यशस्वी कारकीर्दीत एकाच चित्रपटात नायिका साकारायची संधी मिळणे म्हणजे निराश होण्याची शक्यता असते. पण बेला बोसने ते होऊ दिले नाही. या गुणाची दखल हवीच. बेला बोसने रुपेरी पडद्यावर साकारलेल्या काही लोकप्रिय गाण्यांचा उल्लेख हवाच. देवर (रुठे सैंया हमारे सैंया क्यूं रुठे) वहाँ के लोग (जिंदगीका नशा हल्का हल्का सुरुर) चा चा चा (हेलनसोबत इंटर नॅशनल डान्स) , शिकार (जबसे लागी तोसे नाजरिया..आशा पारेखसोबत), अनिता (है नजर का इशारा...मधुमती बरोबर) मैं नशेमें हूँ (ये न थी हमारी किस्मत के विसाल ए यार होता) ठाकूर जर्नेल सिंग (बिछुवा ने डंख मारा हाय हाय लाहाय) अशी विविधतापूर्ण गाणी त्यांनी रुपेरी पडद्यावर साकारलीत. चिराग कहाँ रोशनी कहाँ, छोटे नवाब, प्रोफेसर, प्रेम पत्र, अनपढ, बंदिनी, जिद्दी, चित्रलेखा, पूनम की रात, बहारों के सपने, शिकार, दिल दौलत दुनिया, अभिनेत्री, अशा एकूण १५० हिंदी, बंगाली चित्रपटात भूमिका साकारलीय ही क्षमता आणि सातत्य निश्चितच दाद द्यावी असेच आहे. विशेषत: स्वकष्टातून कारकीर्द घडवलेल्या कलाकाराची ही झेप विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. आदर्श ठरावा अशी बेला बोसची वाटचाल आहे, पण दुर्लक्षितही आहे हे दुर्दैव.

बेला बोसने बंगाली आणि हिंदी पौराणिक धार्मिक सामाजिक चित्रपटांचे नायक आशिशकुमार सेनगुप्ता यांच्याशी १९६७ साली प्रेमविवाह केला आणि त्यानंतर आशिशकुमारसोबत राजा हरीश्चंद्र, जय द्वारकाधिय, जय संतोषी माँ अशा काही चित्रपटातून भूमिका साकारल्या. 'जय संतोषी मा' (प्रदर्शन ३० मे १९७५) हा चित्रपट आजही चर्चेत असतो हे विशेष. त्यांना दोन मुले! मुलगा अरिजीत सेनगुप्ताने एम बी ए केले असून स्वतः चे कॉर्पोरेट ऑफीस आहे. मुलगी मधुश्री नायर कोईमतूर येथे सरकारी हॉस्पिटलमध्ये डॉक्टर आहे. आशिशकुमारचे २०१३ मध्ये निधन झाले. मुलाच्या व्यवसायामुळे बेलाजींचे वास्तव्य नंतर नेरूळ येथे मुलाकडे होते. नातवंडासमवेत नानी आणि दादी बनून त्या सुखासमाधानाने जीवन व्यतीत करत होत्या. बेला बोसचे वयाच्या ८१व्या वर्षी वाशी येथे एका इस्पितळात ह्रदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. आणि एक नृत्य कौशल्याने ओळखली गेलेली अभिनेत्री काळाच्या पडद्याआड गेली. यूट्यूबवरील गाण्याच्या रुपाने बेला बोस आपल्यात नक्कीच राहिल. लोकप्रिय गाण्यांमुळे एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढ्यात जात असतात त्याचप्रमाणे अनेक गुणी कलाकारही ज्ञात होत असतात. बेला बोसला श्रध्दांजली!

# भावस्पर्शी लेखनाचे धनी कुसुमाग्रज

मराठी भाषेला महानुभवापासून ते अगदी अलिकडच्या मोबाईल युगातील मराठी परंपरेचा एक दीर्घ असा वारसा आहे. ज्ञानेश्वरांपासून ते अगदी अत्याधुनिक काळात आणि युवा साहित्य अकादमी विजेता लेखक प्रणव सुखदेवपर्यंत मराठी बोली आणि मराठी प्रादेशिक बोली असा फरक केला गेला असला तरी या दोन्हीमध्येही मराठी साहित्य निर्मिती ही विपुल झाली आहे. विपुलतेचे प्रमाण हे मराठी बोलीला एकदाच प्राप्त झाले नाही तर त्यासाठी प्राचीन मराठी वाङ्मयापासून ते आधुनिक मराठी वाङ्मयापर्यंतचा वारसा लाभला आहे. या वारसा परंपरेतील एक नाव म्हणजे विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज. कुसुमाग्रजांनी मराठी कविता अत्युच्च पातळीवर नेऊन ठेवली असली तरी त्यांनी आपल्या भाषेचा अभिमान राखताना इतर भाषांचाही त्यांनी मान ठेवला म्हणून भारत सरकारतर्फे त्यांना ज्ञानपीठ पुरस्काराने गौरवण्यात आले.



कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी म्हणजेच २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात येतो. कवी कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याच्या निमित्ताने २७ फेब्रुवारी हा दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय २१ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्र सरकारने घेतला, परंतु याच दिवसाला अनेक जण 'मराठी राजभाषा दिन' असेही म्हणतात, मात्र महाराष्ट्र सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने १० एप्रिल १९९७ रोजी काढलेल्या परिपत्रकात १ मे हा 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा करण्यात यावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तसा तो महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून १ मे रोजी साजरा करण्यात येत होता, परंतु कालांतराने तो विस्मृतीत गेला. त्यामुळे १९९७ ला शासनाला पुन्हा परिपत्रक काढावं लागलं. २८ एप्रिल ते ३० एप्रिल १९९७ या तीन दिवशी विविध उपक्रम आयोजित करून १ मे रोजी समारंभपूर्वक सांगता सोहळा करावा आणि त्याचदिवशी मराठी राजभाषा साजरा करावा असा निर्णय सरकारने घेतला. सरकारच्या या निर्णयामुळे १ मे रोजी मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात येतो.

'मराठी राजभाषा दिन' आणि 'मराठी भाषा गौरव दिना'प्रमाणेच २१ फेब्रुवारी रोजी जागतिक 'मातृभाषा दिन' साजरा केला जातो. युनेस्को या जागतिक पातळीवरील संस्थेनेच २१ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक मातृभाषा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे या दिवशी आपल्या मातृभाषेवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी २१ फेब्रुवारी रोजी दरवर्षी 'जागतिक मातृभाषा दिन' साजरा केला जातो. १ मे रोजी साजरा होणारा 'मराठी राजभाषा दिन', २१ फेब्रुवारी रोजी साजरा होणारा 'जागतिक मातृभाषा दिन' आणि २७ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येत असलेला 'मराठी भाषा गौरव दिन' हे तीनही दिन वेगवेगळे दिन विशेष आहेत हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. मराठी कवितेला कुसुमाग्रजांनी एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. शिवाय महाराष्ट्राच्या बोलीला साहित्यात विशेष असे स्थान निर्माण करून देण्यात कुसुमाग्रजांचं मोलाचं योगदान आहे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. कुसुमाग्रज यांचा जन्म नाशिक येथे २७ फेब्रुवारी १९१२ रोजी झाला. विष्णू वामन शिरवाडकर यांच्या मोठ्या बहिणीचे नाव कुसुम होते. त्या नावावरूनच त्यांनी आपले कवी म्हणून कुसुमाग्रज हे नाव वापरले. कुसुमाग्रज यांनी आपल्या आत्मनिष्ठ प्रतिभेने आणि समाजनिष्ठ भावस्पर्शी लेखणीने जागतिक दर्जाचे लेखन केले.

मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने शाळा व कॉलेजमध्ये निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच ठिकाणी मराठी नाटके काव्य संमेलन व मराठी संगीताचा कार्यक्रम आयोजित केला जातो. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपण सर्वांनी मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे. तरच मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला खरा अर्थ प्राप्त होईल.

जीवनलहरी, किनारा, मराठी माती, वादळवेल अशा प्रकारचे त्यांचे प्रकाशित काव्यसंग्रह आहेत. तसेच दुसरा पेशवा, वीज म्हणाली धरतीला, नटसम्राट, राजमुकुट ही त्यांची गाजलेली नाटके आहेत.

मराठी भाषा ही नवव्या शतकापासून प्रचलित आहे व त्यांची निर्मीती संस्कृतपासून झाली आहे. महाराष्ट्र आणि गोवा या दोन्ही राज्यांची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी बोलणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही भारतातील तिसरी व जगातील पंधरावी भाषा आहे. माझ्या मराठीची बोलू कौतुके ,परी अमृतातेही पैजा जिंके, ऐसी अक्षरे रसिके मेळविन असे लिहून संत ज्ञानेश्वर म्हणतात की मराठी भाषेचा गोडवा अमृतापेक्षा ही जास्त आहे.

वैष्णव, जान्हवी, कल्पनेच्या तीरावर या कादंबऱ्या अशा अनेक साहित्य आणि कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेचे महत्त्व लोकांसमोर मांडले. कुसुमाग्रज यांचे मराठी साहित्यातील योगदान अवर्णनीय आहे त्यांनी त्यांच्या साहित्याची सुरुवात कवितेपासून केली. पुढे कथा कादंबरी ललित वाङ्मयातील नावाजलेली साहित्य रचना यांच्या लिखाणातून अवतरत गेली. तसे पाहिले तर आपल्या मराठी संस्कृतीचा वारसा खूप मोठा आहे.

आपल्या मराठी माती मराठी चित्रपट, नाटक, काव्य, कविता इत्यादींचा फार मोठा वाटा आहे. आपल्या या मराठी मातीत अनेक संत होऊन गेले. संत रामदास, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामाचे अनेक संतांनी मराठी भाषेतून स्तोत्र, श्लोक लिहिले आणि लोकांना मानवी कल्याणाचा संदेश तर दिलाच त्याचबरोबर मराठी भाषेचा ठसा लोकांवर लोकांचा मनावर उमटवला. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी संस्कृतीचे आणि मराठी भाषेचे रक्षण केले. एवढेच नव्हे तर अनेक प्रसिद्ध कलाकार या मराठी मातीत घडले, पण या मराठी भाषेला काही लोक विसरत चालले आहेत. मायबोलीचा त्याग करून लोक इंग्रजी भाषेचा अवलंब करत आहेत. इंग्रजी ही काळाची गरज आहे नक्कीच त्याबद्दल दुमत नाही पण, त्यासाठी मराठी भाषेला विसरणे योग्य नाही. आपण सर्वांनी मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे ही सुरुवात आपल्या घरापासून करायला हवी अशा गोष्टी मुळेच मराठी दिन साजरा केल्याचे खरे सार्थक होईल.

**-संजीवनी जाधव-पाटील,**
**सहाय्यक संचालक (माहिती)**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

# देशप्रेमी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

सावरकरांचे मुळ घराणे कोकणचे, परशुराम भूमीतील गुहागर विभागातले. छत्रपती शिवराय आणि बाजीरावांच्या काळात त्यातील काही घराणी देशावर आली. त्यातीलच सावरकर कुटुंब नाशिकजवळील भगूर येथे स्थिर झाले. येथेच २८ मे १८८३ रोजी दामोध्ररपंत सावरकरांच्या पत्नी राधाबाई यांनी चौथ्या मुलाला जन्म दिला. त्यांचे तेजस्वी नेत्र, विशाल भाळ, आकर्षक मुद्रा पाहून नाव ठेवले विनायक, म्हणजे विशेष नायक! पण याच विनायकाला लहानपणात मातृसुखाला पारखे व्हावे लागले.


लहानाचे मोठे होत असताना त्यांना लेखन व वक्तृत्व या गुणांचा छंद जडला. एकदा एका वक्तृत्व स्पर्धेची बातमी त्यांना उशिरा समजली. तरीही त्यांनी त्या स्पर्धेत भाग घेतला पण भाषण करणाऱ्यांच्या यादीत त्यांचे नाव शेवटी आले. सर्व स्पर्धकांची भाषणे ऐकताना परीक्षक कंटाळले होत. अश्या वेळी सावरकर भाषणासाठी उभे झाले. त्यांच्या बाणेदार विचारांनी, ओघवत्या भाषेनी परिक्षकांचा कंटाला कुठल्या कुठे गेला. त्या स्पर्धेत सावरकरांना पहिला क्रमांक मिळाला.

बक्षीस वितरण कार्यक्रमात एक परीक्षक बोलताना म्हणाले, सावरकर आता जे काही बोलला ते काही त्याचे विचार नसावेत. त्याच्या वयाला झेपणारे हे विचार नाहीत. त्याने दुसऱ्या कुणाकडून तरी हे भाषण लिहून घेतले असणार, पण ते काहीही असले तरी तो बोलला उत्कृष्ट. म्हणूनच आम्ही त्याला पहिला क्रमाक दिला, मात्र त्याच वेळी सावरकरांनी परीक्षकांना ठणकाउन सांगितले. हे भाषण माझे आहे मी कोनाकडुनही लिहून घेतलेले नाही. मला सवय आहे ती स्व:त चे विचार मांडण्याची मी दुसऱ्या कोणाकडूनही विचार उसने घेत नाही. परीक्षक पाठ थोपटत म्हणाले सावरकर नाव यथार्थ कर बरे का! ज्याचा कर पडत्या राष्ट्राला सावरतो. तोच खरा 'सावरकर'. नंतर सावरकरांनी आपल्या नावाची यथार्थता आपल्या कर्तुत्वाने सिद्ध केली. आपल्या वयाची पंधरा वर्षे पूर्ण होण्याच्या आधीच सावरकरांनी भरपूर वाचन केले. मराठ्यांचा इतिहास, बखरी वाचल्या. महा भारत वाचल्यावर अर्जुनापेक्षा भीम हाच खरा श्रेष्ठ आदर्श पुरुष असल्याचे मत त्यांनी मांडले.

ते शिक्षणासाठी पुढे इंग्लंडला गेले. तेथे शिक्षण चालू असतानाही देश कार्यात खंड पडू दिला नाही वयाच्या सोळाव्या वर्षी सक्रीय राजकारणात ते भाग घेऊ लागले. इंग्लंड तेथेच त्यांनी 'अभिनव भारत' ही क्रांतीसंघटना चालू केली. गावठी पिस्तुले तयार करून मित्रांकरवी एकवीस पिस्तुले भारतात पाठविली. १८५७च्या सहस्त्र उठावाची माहिती व्हावी म्हणून स्वातंत्र्य समर हा जवळ जवळ ५०० पृष्ठांचा मौलिक ग्रंथ लिहिला त्यात हिंदू राष्ट्राच्या दृष्टीकोनातून क्रांती युद्धाचे समीक्षण संपूर्णपणे केलेले असल्याने याची परिणीती म्हणजे स्वातंत्र्ययुद्ध भडकवण्याचिच होती. त्यामुळे ब्रिटीशांची तपासाची चक्रे गतिमान झाली व त्यातच सावरकरांना अटक झाली. ब्रिटीशांच्या कडक पहार्यातून नेले जात असतानाच मार्सेलिस बंदरात त्यांनी सागरात झेप घेतली. त्यांची हि उडी सामान्य नव्हती.ती या त्रिखंडात गाजली. अश्या अनंतप्रसंगामुळेच त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली.

सावरकर हे मुळातच राष्ट्रीय वृत्तीचे, उत्तुंग प्रतिभेचे कवी होते. स्वातंत्र्यसमर, जोसेफमोझिनी, माझी जन्मठेप, सहा पाने सोनेरी, सन्यस्त खड्ग , काळेपाणी, गोमंतक, कमला, सप्तर्षी, जातिभेद, हिंदुराष्ट्र दर्शन, हिन्दुपद्पातशाही, हिंदुत्व, क्रांतीघोष, पृष्ठ भूमी, ई. विविध वाङ्मयातील पुस्तके त्यांनी समरसून लिहिली. एका बाजूला स्वातंत्र्यवीर तर दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्यशाहीर अश्या सगळ्या रसायनांमुळे त्यांची कविता म्हणजे स्वातंत्र्य देवतेची आरतीच झाली. ते महान कवी म्हणावे लागेल. त्यांच्या या ओजस्वी साहित्याचा सन्मान करायचा म्हणून १९३८ साली मुंबई येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांना निवडण्यात आले होते. ते कट्टर हिंदुत्ववादी होते, पण स्पृश्य-अस्पृश्य हा भेदभाव त्याच्यात नव्हता. विज्ञान दृष्टीही त्यांना लाभली होती. २४ डिसेंबर १९१० रोजी त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. ६ जानेवारी १९२४ रोजी रत्नागिरी कारागृहात त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. पुढे दोन वेळा स्थानबद्धतेत वाढ होऊन अखेर १९३७ला ही स्थान बद्धता संपली.

गांधी युगाच्या आगमना नंतर 'दे दी हमे आझादी बिना खड्ग बिना ढाल' हे स्वर सर्वीकडे दुमदुमतात त्या गदालोळात न डगमगता देशाच्या स्वातंत्याचा नि त्याचा रक्षणाचा मार्गही बंदुकीच्या नळीतून जातो, या इतिहाससिद्ध तत्वाचा प्रचार करणारा पहिला निर्भीड देश भक्त होता तो म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर! ब्रिटीशांसारख्या बलाढ्य शत्रूंशी सशस्त्र संघर्ष केलेल्या या स्वातंत्र्य वीराचे '५७ वे स्वातंत्र्य समर 'म्यझिनी' ची प्रस्थावना 'माझी जन्मठेप यां सारखे ज्वालाजहाल ग्रंथ क्रांतीकारकांसाठी भगवतगीताच ठरले, पण अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये प्रखर देशाभिमानातून स्फुरलेल्या स्वातंत्रेच्छां मुखरित करण्यासाठी कविता हाच स्वातंत्र्यवीराचा प्राण होता. म्हणूनच हाती कागद नसतानाही तुरुंगाच्या भिंतीवर त्यांचे काव्य स्त्रवू शकले. अखेर २६ फेब्रुवारी १९६६ रोजी ते काळाच्या पडद्या आड गेले. परंतु त्यांच्या साहित्य, ग्रंथ लेख या रूपाने इतिहास कायम आहे, त्यांची स्मृती आजही अजरामर आहे. सागरा प्राण तळमळला...



**१८५७च्या स्वातंत्र्य समरानंतर सशस्त्र क्रांतीचा इतिहास वीर सावरकरांच्या नावाशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडामध्ये त्यांनी दिलेली पूर्णाहुती, त्यासाठी ज्या यातना, हाल-अपेष्टा सहन केल्या त्याचा इतिहास जर साक्षी नसता तर पुढील क्रांती घडणे अशक्य होते.**

**(साभार : मराठी अनलिमिटेड)**

# खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी महाड यांचे कार्यालय
ता. महाड, जि. रायगड
दिनांक. १३/०२/२०२३

**क्रमांक :- भूसंपादन / कात-५/ विन्हेरे, फाळकेवाडी, ताम्हाणे/ थेख / नोटीस / २०२३**

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांनी रा.मा. ९६ ते नागांव करंजाडी फाळकेवाडी तुळशीखिंड नातूनगर मार्ग रा.मा. १७५ चे विन्हेरे, फाळकेवाडी, ताम्हाणे या सार्वजनिक प्रयोजना करीता शासननिर्णय, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र. ३४/ अ-२, दिनांक १२ मे २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने महसूल विभागातर्फे संपादन करणे संबंधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड याचे कडील पत्र क्र. जा.क्र. मवि/प्रशा/का-३ (१) १८९७, दिनांक २९/०६/२०२१ अन्वये प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे आदेश क्रमांक १) भूसंपादन / टे-६/ ४७३३५/मौजे विन्हेरे / २०२१ दिनांक ११/१०/२०२१) भूसंपादन/ टे-६/ मौ. फाळकेवाडी/४७३३०/२०२१ दिनांक ११/१०/२०२१) भूसंपादन/ टे-६/ मौजे ताम्हाणे /४७३३६/२०२१ दिनांक ११/१०/२०२१ अन्वये उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन ०१/२०१७/ प्र.क्र. १२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी प्रतिमा पुदलवाड - शेंगुलवार, उपविभागीय अधिकारी महाड याद्वारे,

१. अनुसूची एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.
२. प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल -१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.
३. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे जिल्हा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.
४. संबंधित भूधारकांची ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांचेकडे दाखल करावीत.
५. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच सदर नमुना महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.
६. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी महाड व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची- १**

**मौजे विन्हेरे, ता. महाड, जि. रायगड**

| अ.क्र. | गट नंबर | एकूण क्षेत्र (हे. आर) | संपादित क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | १२३५ | १३.३ | ४.९० |
| २ | १२४३ | २१.०० | ६.६० |
| ३ | १२४२ | २२.०० | ५.६० |
| ४ | १२४१ | ३८.०० | ६.७० |
| ५ | १२५९ | १६.०० | ४.२० |
| ६ | १२६१ | २४.०० | ०.५० |
| ७ | १२६० | १७.०० | ६.९० |
| ८ | १२८४ | ४१.०० | ५.३० |
| ९ | १२८५ | १२.०० | ३.४० |
| १० | १२८७ | १८.२ | ०.४० |
| ११ | १२८६ | ३८.०० | १०.७० |
| १२ | १३१८ | १०.४ | ०.९० |
| १३ | १३२२ | ३५.०० | ७.६० |
| १४ | १३१९ | ७.०० | ४.०० |
| १५ | १३५२ | २०.०० | ७.८० |
| १६ | १३५३ | २२.०० | २.६० |
| १७ | १३५५ | ५२.०० | ८.७० |
| १८ | १३५४ | २१.०० | ४.५० |
| १९ | १३७६ | २०.०० | ५.०० |
| २० | १३७५ | २४.०० | ४.०० |
| २१ | १४१५ | ४८.३ | ५.०० |
| २२ | १४१६ | २०.०० | ४.६० |
| २३ | १४३१ | २८.०० | ६.०० |
| २४ | १४३० | ७०.८ | ११.३० |
| २५ | १४३२ | १३९.४ | २०.२० |
| २६ | १४३३ | ८३.०० | ९.६० |
| २७ | १४४५ | १६४.०० | ३८.२० |
| २८ | १४५० | ३८.०० | ११.८० |
| २९ | १४३९ | ८०.०० | २.७० |
| ३० | १४५१ | २९.०० | ५.६० |
| ३१ | १४५८ | २०.०० | १.५० |
| ३२ | १४६० | ४३.०० | २.५० |
| ३३ | १४५९ | ७६.०० | ११.६० |
| ३४ | १४६३ | ३४.०० | ७.४० |
| ३५ | १४७७ | २८.८ | १.९० |
| ३६ | १४६२ | १०.०० | ०.१० |
| ३७ | १४७० | ५१.०० | ११.८० |
| ३८ | १४६९ | २१.०० | ८.०० |
| ३९ | १४७१ | १४९.०० | ०.४० |
| ४० | १४६८ | ७९.०० | १९.८० |
| ४१ | १४७६ | २९.०० | ५.४० |
| ४२ | १४७८ | १९.०० | ५.५० |
| ४३ | १४७९ | ४७.०० | ९.७० |
| ४४ | १४८१ | ४४.०० | ८.०० |
| ४५ | १४८० | २७.०० | १०.६० |
| ४६ | ३८ | ३३.६ | २.२० |
| ४७ | ३६ | १५.२ | ४.६० |
| ४८ | ३५ | २४.८ | ४.०० |
| ४९ | ३९ | १.८ | १.८ |
| ५० | ३४ | ७.८ | १.३० |
| ५१ | ४० | ८.८९ | ३.९० |
| ५२ | गावठाण | ६८१.१० | ४.०० |
| ५३ | ४५ | ५.७६ | ०.५० |
| ५४ | ४३ | ३३.०० | ८.५० |
| ५५ | ४४ | ५.३ | २.७० |
| ५६ | ५६ | ५८.९ | १३.५० |
| ५७ | ५७ | ११.४ | ५.०० |
| ५८ | ५९ | ३६.८ | २.०६ |
| ५९ | १६९३ | १२.१ | ४.३० |
| ६० | ५३ (अ+ब) | १५.५ | ०.९० |
| ६१ | ११७ | २७.०० | ५.३० |
| ६२ | ११८ | १०.०० | ०.८० |
| ६३ | ११९ | १७.०० | ३.१० |
| ६४ | १२० (अ+ब) | ८०.०० | ८.५० |
| ६५ | १२५ | ३५.०० | ४.२० |
| ६६ | १२४ | १६.०० | २.३० |
| ६७ | १२३ | २०.७ | २.६० |
| ६८ | १२२ | ६.६ | २.५० |
| ६९ | १५९ | १८.९० | ९.९० |
| ७० | १६० | १३.०० | ४.७० |
| ७१ | १७२ | १०.०० | ५.७० |
| ७२ | १७३ | ७.०० | १.८० |
| ७३ | १७१ | २५.०० | ९.३० |
| ७४ | १६८ | ४२.५ | १५.०० |
| ७५ | १६९ | ४६.०० | ०.८० |
| ७६ | १८४ | २६.०० | ०.६० |
| ७६ | १८५ | ४०.४ | ९.७० |
| ७८ | १९४ | २२.८ | ७.३० |
| ७९ | १९२ | २४.५ | ८.३० |
| ८० | १८९ | ४२.०० | ०.५० |
| **एकूण** | | **३३३२.६** | **४८१.६६** |

**मौजे फाळकेवाडी, ता. महाड, जि. रायगड**

| अ.क्र. | सव्हें नंबर | एकूण क्षेत्र (हे. आर) | संपादित क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | ४६/१ | ६१.२ | ०.४० |
| २ | ४७/८ (अ+ब) | २७८ | २९.१० |
| ३ | ४७/७ | २.०० | ०.५० |
| ४ | ४७/६ | २६.०० | २.०० |
| ५ | ४७/३३ | ५.०० | १.५० |
| ६ | ४७/९ | ७२.०० | १६.०० |
| ७ | ४७/१० | ४६.०० | ३.०० |
| ८ | ४७/११ | १११.०० | १७.०० |
| ९ | ४७/२१ | १९७.०० | ३६.२० |
| १० | ४७/२० | ५९.०० | १२.४० |
| ११ | ४७/२५ | ११.०० | ४.५० |
| १२ | ४७/२८ | २.०० | २.०० |
| १३ | ४७/२४ | ७.०० | ३.३० |
| १४ | ४७/२३ | ६२.०० | ९.०० |
| १५ | ४७/१५ | ६९.०० | १२.१० |
| १६ | ५१/१६ | ५.०० | २.९० |
| १७ | ५१/१३ | १०९.०० | ११.७० |
| १८ | ५१/१२ | ८०.०० | ९.२० |
| १९ | ५१/२४ | ६४.०० | ८.३० |
| २० | ५१/०५ | ८.०० | ३.०० |
| २१ | ५७/२४ | ३७.०० | ५.२० |
| २२ | ५७/२१ | ४८.०० | ८.३० |
| २३ | ५७/२० | ४२.०० | ९.८० |
| २४ | ५७/१७ | ८८.०० | १.३० |
| २५ | ५७/१८ | २०.०० | ६.५० |
| २६ | ५७/२६ | ४२.०० | ९.०० |
| २७ | ५७/२२ | ३३.०० | ४.०० |
| २८ | ५७/२३ | २१.०० | ११.९० |
| २९ | ५२/० | ४.०० | २.८० |
| ३० | ५५/६ | १.०० | ०.५० |
| ३१ | ५५/५ | १.५ | ०.१० |
| ३२ | ६२/१३ | ६.०० | १.७५ |
| ३३ | ६२/११ | ६४.०० | १३.५० |
| ३४ | ६२/१० | ३८.०० | ६.७० |
| ३५ | ६२/९ | ७६.८० | १४.६० |
| ३६ | ६२/१४ | ३५.०० | ६.९० |
| ३७ | ६२/८ | १३.०० | २.३० |
| ३८ | ४८/१ | ६.०० | ४.०० |
| ३९ | ४८/२ | ३०.०० | ३.५० |
| ४० | ६३/२ | ४.५ | ३.६० |
| ४१ | ६३/३ | १९.६ | ८.२० |
| ४२ | २/० | ३०.०० | ४.४० |
| ४३ | ३/२ | ३.६ | १.२० |
| ४४ | ५/११ | १२.८० | ०.५० |
| ४५ | ५/१७ | २.०० | ०.६० |
| ४६ | ५/१८ | १.०० | ०.२० |
| ४७ | ५/१४ | २.५ | १.७० |
| ४८ | ५/१५ | ९.९ | ५.४० |
| ४९ | ५/१६ | २.३ | ०.३० |
| ५० | ५/१२ | ७.०० | ४.८० |
| ५० | ५/८ | ६.०० | ३.४० |
| ५२ | ५१७ | १२.१ | ३.०० |
| ५३ | ५/५ | ३.०० | २.५० |
| ५४ | ९/२० | २७.०० | ९.०० |
| ५५ | ९/२१ | १४.०० | ५.९० |
| ५६ | ६/२ | १०.६० | १.८० |
| ५७ | ८/१ | १९.०० | ५.१० |

(पुढील मजकूर पान ७ वर)

# वाचनामुळे आपला दृष्टिकोन बदलतो!



अशोक लोटणकर
ज्येष्ठ कवी-लेखक
मुलुंड (पूर्व) मुंबई

## वाचाल तर वाचाल
### साहित्यिकांची आवडती पुस्तके

**वाचनामुळे आपला दृष्टिकोन बदलतो. सर्जनशिलता, संवेदनक्षमता व सहृदयता वाढते आणि आयुष्याला चांगले वळण लागते. यासाठी ग्रंथ प्रसाराला चालना देणे खूप महत्वाचे आहे. असे म्हणतात की, 'वाचक' हा मूक लेखक असतो आणि लेखक हा मूक रसिक असतो. साहजिकच कोणतीही उत्तम कलाकृती वाचकांच्या मनाला भिडते.**

वाचन संस्कृती वाढायला हवी, असे सातत्याने बोलले जाते. तसे प्रयत्नही केले जातात, परंतु अलिकडे इंटरनेट आणि 'व्हॉटसअॅप'च्या जमान्यात तरुणपिढी वाचनाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास येते. 'मेसेजेस'च्या माध्यमातून होणारे वाचन या पलिकडे, साहित्यिक कलाकृतींचा आस्वाद घेणे कमी होत आहे. माणूस कला सुसंगत आणि अद्ययावत राहण्यासाठी वाचन अत्यावश्यक आहे. मानवी जीवनाला आणि दु:खाला अनेक अंगांनी स्पर्श करणारे लेखन. मग ती कादंबरी, ललित, कथा किंवा कविता असो...वाचकाचा विचारमंथन करायला लावते कारण एकूण साहित्यातून मानवी भाव भावनांचजे समग्र व्यक्तिमत्वाचे दर्शन घडत असते. जे वाचकांच्याच जीवनाचा एक भाग असते. सुजाण वाचक आणि लेखक/कवीदेखील आपल्या घरी स्वताचं असं ग्रंथालय बनवीत असतो. महिन्याकाठी नवी पुस्तके खरेदी करणारेही वाचक लेखक कमी नाहीत. माझ्याकडेदेखील विपुल ग्रंथसंपदा आहे. अनेक आवडत्या कादंबऱ्या, कथासंग्रह, ललित गद्य, बालसाहित्य, काव्यसंग्रह मी खरेदी कलेले आहेत. पुस्तक खरेदी करण्याचा मोठा फायदा म्हणजे ते आपले स्वत:चे असते आणि आपणास हवे तेव्हा आपण ते वाचू शकतो. या उलट ग्रंथालयातील पुस्तकांना वेळेच बंधन असतं. वाचन घाईने करावे लागते. माझ्याच ग्रंथालयातील तीन लक्षवेधी काव्यसंग्रह, जे मला मनापासून आवडले. त्याबाबत मी लिहितो आहे. ज्येष्ठ कवी मंगेश सावंत, कवी साहेबराव ठाणगे आणि डॉ. सुनील सावंत यांचे यांच्या कविता संग्रहावर मी भाष्य करीत आहे.



### पांढरे कावळे
**-साहेबराव ठाणगे**
**(प्रकाशक : संवेदना प्रकाशन पुणे)**

ज्येष्ठ कवी साहेबराव ठाणगे यांचा 'पांढरे कावळे' हा काव्यसंग्रह गेल्यावर्षी प्रकाशित झालेला आहे. साहेबरावांचा हा पाचवा काव्यसंग्रह. दरम्यान ललित लेख संग्रहाची तीन पुस्तके, एक व्यतिचित्र संग्रह आणि एक संपादित चरित्र... अशी एकूण दहा पुस्तके साहेबरावांच्या नावावर आहेत. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून सरव्यवस्थापक या पदावरुन ते निवृत्त झालेले आहेत. 'पांढरे कावळे' हे शिर्षकच एकूण व्यवस्थेच्या विरोधात उपरोधिक स्वरुपाचे आहे. ज्येष्ठ कवी अशोक बागवे यांनी साहेबराव ठाणगे यांचा हा कवितासंग्रह 'कृष्ण धवल' रंगानी सजलेला आहे असू नमूत करुन यातला 'कृष्णरंग' हा पर्जन्यछायेच्या प्रदेशात कधी काळी चुकारपणे आकाशात दिसणाऱ्या कृष्ण मेघांनी आतुरतेने वाट पाहण्याचा आहे. कृष्णधवल बरसल्यावर मनोमन फुललेल्या इंद्रधनूच्या भावनांचा आहे. 'पांढरे कावळे/उचलती पिंड' जणू झाले बंड / 'चलो खाओ'... निसर्गाचे विभ्रम कोमल, हळुवार प्रतिमेत चितारणाऱ्या या कवीची लेखणी कधी सामाजिक दुरवस्था करणाऱ्या लफंग्यांविरोधात रुद्रावतार धारण करते. 'दारात दौलतीच्या लाचार लाख मुजरे, मस्तीत मालकाच्या, मुजोर मात्र हुजरे।' असे म्हणणारा कवी शेवटी 'मीच चालतो माझ्या संगे... मीच बोलतो माझ्या संगे, नाही कुणाशी देणे घेणे ... मीच भांडतो माझ्या संगे।' अशी तटस्थ भूमिका घेतो. आवर्जून वाचावा अशा या संग्रहाची सुंदर निर्मिती संवेदना प्रकाशनाने केली आहे.



### मी देशाचा सातबारा लिहिन म्हणतो
**-रमेश सावंत**
**(प्रकाशक : अष्टगंध प्रकाशन, ठाणे)**

'मी देशाचा सातबारा लिहिन म्हणतो...' अशा लांबलचक शिर्षकाचा कवी रमेश सावंत यांचा परिचय काहीसा आगळा वेगळा काव्यसंग्रह प्रकाशीत झाला आहे. त्यांचे अनेक काव्य संग्रह प्रकाशीत आहेत. प्रस्तुत काव्यसंग्रहातून अर्थात कवितांमधून कवी सावंत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा महत्वाचा प्रश्न उपस्थित करीत आहेत. आजच्या असुरक्षिततेच्या कालखंडात जगत असताना दडपशालीच्या विरोधात या कवितांच्या माध्यमातून ते आवाज उठवतात. अशा धोकादायक स्थितीतही निराश न होता ठामपणे आपली भूमिका मांडणारे सावंत निराशावादी नाहीत ही आश्वासक गोष्ट असल्याचे नामवंत समीक्षक डॉ. रमेश साळुंखे यांनी म्हटले आहे. समीक्षकांच्या नजरेतून सदर काव्यसंग्रहातून पाच आशय सूत्रे मांडली आहेत. एक म्हणजे बिघडत जाणारी समाजव्यवस्था, त्यातून बदलत जाणारी खेडी, इथला निसर्ग राजकीय हस्तक्षेप आणि बदलणारी अर्थव्यवस्था यामुळे काळाच्या एका विशिष्ट कचाट्यात सापडलेल्या माणसाची ही कविता प्रतिनिधीत्व करताना आढळते. बिघडत जाणाऱ्या व्यवस्थेत सामान्य माणूस कसा तग धरु पाहतो हे सावंत एका पटलावर सांगत असताना काळाचा उलट प्रवाह फार वेगाने होत आहे. त्यामुळे माणूस, निसर्ग आणि राजकीय प्रवाह यांचे एकंदरीत नाते किती बदलत आहे हे कवी रमेश सावंत यांची कविता अधोरेखीत करते. प्रखर सामाजिक जाणिवा हा सावंत यांच्या कवितांचा गाभा आहे. आवर्जून वाचावा... चिंतन करावे असा हा संग्रह आहे.



### सूर्य दिसत राहील तोपर्यंत...
**लेखक-डॉ. सुनील सावंत**
**(प्रकाशक-वंदना प्रकाशन, मुंबई)**

डॉ. सुनील सावंत म्हणजे साहित्य क्षेत्रातील एक नामवंत कवी, लेखक त्यांची स्वत:ची पंचवीसहून अधिक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. शिवाय 'वंदना प्रकाशन, मुंबई' ही त्यांची प्रकाशन संस्था देखील आहे. अत्यंत सृजनशील, चिंतनशील आणि अभ्यासू व्यक्तिमत्व. त्यांनी अनेक इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद केले आहेत तर मराठी कादंबऱ्यांचे इंग्लिश अनुवादनही केले आहेत. 'सूर्य दिसत राहील तो पर्यंत...' या काव्यसंग्रहतल्या त्यांच्या कविता विचार करायला लावणाऱ्या... अंतर्मुख करणाऱ्या आहेत. आपल्या भोवतीचे सामाजिक, राजकीय जीवन ते संवेदनशील मनाने न्याहाळतात. या जीवनात माणसाच्या हिताची बीजे आहेत की अहिताची याचा सखोल विचार करतात. सभोवतालची ही परिस्थिती भीतिदायक आहे. सुनील सावंत या वास्तवाकडे डोळे उघडे ठेवून पाहतात. मंगेश पाडगावकर यांनी यातील कवितांवर भाष्य करताना असे म्हटले आहे की, सुनील सावंत यांच्या कवितेतून व्यक्त होणारी स्त्री नटवी, सुखासीन बाहुली नाही. समतेच्या नव्या युगाची ती प्रतिनिधी आहे. तशी नटवी, सुखासीन बाहुली असणे हे पुरुषाला हवे आहे. याची तिला जाणीव असल्यामुळेच 'मी तुला आवडते म्हणजे माझं काय आवडतं?' असा स्पष्ट प्रश्न मी विचारते. आपल्या व्यक्तिमत्वाची प्रखर जाणीव ही स्त्री व्यक्त करते. पाडगावकर सर पुढे असेही म्हणतात की, सुनील सावंत यांची भाषा सरळ साधी आहे. शाब्दिक युक्त्यांवर तिचा भर नाही. तिचे बळ ती तिच्या आशयात शोधते. पद्मश्री नारायण सुर्वे यांनी देखील या काव्यसंग्रहातील कवितांची प्रशंसा केली आहे. हा काव्यसंग्रह आवर्जून वाचावा. संग्रही ठेवावा असाच आहे.

## निवडक

### पोलीस पाटील यांचा सन्मान



**रसायनी :** पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या २० पोलीस पाटलांना त्याचे कर्तव्य, जबाबदारी व अधिकाराची माहिती देऊन शांतिदुत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी रसायनी पोलीस ठाण्याचे वरीष्ठ निरीक्षक अश्वनाथ खेडकर उपस्थित होते. त्यांनी उपयुक्त असे मार्गदर्शन केले. या वेळी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा चे अध्यक्ष अमित शाह, माजी अध्यक्ष बाळकृष्ण होणावळे, अविनाश गाताडे, अनुराधा होणावळे तसेच पनवेल क्लबचे पुरणसिंग मेहरादेखील उपस्थित होते.

### पिल्लई कॉलेजमध्ये मार्गदर्शन शिबिर



**रसायनी :** रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाच्या वतीने गुरुवारी (दि. २३) पिल्लई कॉलेजमध्ये मार्गदर्शन शिबिर राबविण्यात आले. यामध्ये रोटरीच्या पिस कॉम्फ्लिक्ट मॅनेजमेंट या अॅव्हेन्यू अंतर्गत पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील एनएसएसच्या विद्यार्थ्यांना त्याच्या गुळसुंदे येथील निवासी कॅम्पमध्ये रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या या अॅव्हेन्यूच्या डायरेक्टर स्मिता विखनकर यांनी उत्तम मार्गदर्शन केले.

### अत्रे कट्ट्यावर आज 'आभाळमाया'

**पनवेल :** आचार्य अत्रे कट्ट्याच्या वतीने रविवारी (दि. २६) सायंकाळी ५.३० वाजता नवीन पनवेल सेक्टर १० येथील सिडको गार्डनमध्ये आभाळमाया हा कार्यक्रम होणार आहे. संकल्पना व निवेदन प्रसिद्ध नाट्यकर्मी वैशाली केतकर यांचे आहे. नात्याच्या बंधनात गुंफलेल्या भावबंधावर आधारित हा कार्यक्रम असून विविध गाणी प्रसिद्ध गायिका शोभा पराडे सादर करणार आहेत. हा कार्यक्रम सर्व रसिकांसाठी खुला असून त्याचा आस्वाद घेण्याचे आवाहन अत्रे कट्ट्याच्या वतीने सर्व रसिकांना करण्यात आले आहे.

### चिरनेरमध्ये मोतीबिंदू रुग्णांवर शस्त्रक्रिया

**उरण :** चिरनेर येथील सामाजिक कार्यकर्ते समीर गोपाळ डुंगीकर यांनी चिरनेर गावातील सहा मोतीबिंदू




रुग्णांची मोतीबिंदूची शस्त्रक्रिया स्वखर्चाने करून, सामाजिक बांधिलकीतून माणुसकीचे दर्शन घडविले आहे. डुंगीकर यांनी चिरनेर गावातील गीता कातकरी, बेबीबाई नारंगीकर, मंजुळा म्हात्रे, हिराबाई पाटील, तुकाराम मोकल आणि रमेश म्हात्रे या मोतीबिंदू झालेल्या गरजू रुग्णांच्या डोळ्यावर चेंबूर येथील प्रिझम आय केअर या खासगी रुग्णालयात उत्तम प्रतीच्या डोळ्यांची लेन्स टाकून, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया स्वखर्चाने करून घेतली आहे. या शस्त्रक्रियेमुळे या मोतीबिंदूग्रस्त रुग्णांनी समीर डुंगीकर यांचे आभार मानले आहेत.

# अनधिकृत झोपड्यांविरोधात भाजप आक्रमक
## नेरूळमध्ये अनैतिक व्यवसाय वाढले; कारवाईची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ विभागात अनधिकृत झोपड्यांविरोधात भाजप आक्रमक झाली आहे. तातडीने कारवाई करा अन्यथा महिला रस्त्यावर उतरतील, असा इशारा भाजपच्या महिला मोर्चा सरचिटणीस मंगल घरत यांनी शुक्रवारी (दि. २४) पालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांची भेट घेऊन दिला.

नेरूळ सेक्टर २८ येथील साई सृष्टी आणि शिवतेज प्लाझा या इमारतीच्या मागील अनधिकृत झोपडपट्टी उभी राहिली आहे. उद्यानाच्या भूखंडावर ही झोपडपट्टी उभी करण्यात आली आहे. यात सर्वाधिक अनैतिक व्यवसाय सुरू आहेत. या झोपडपट्टीत बंगलादेशींचे वास्तव्यदेखील अहे. याविरोधात तेथील नागरिकांनी



(संग्रहित छायाचित्र)

आंदोलनदेखील केले आहे.

नेरूळ बालाजी मंदिरापाठीमागील भागात उभ्या राहिलेल्या या बेकायदा झोपडपट्टीमुळे आसपासच्या नागरिकांचे राहणीमान धोक्यात आले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे या अनधिकृत झोपडपट्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी नागरिकांचा भरणा असून उजळ माथ्याने अनैतिक व्यवसाय सुरू आहेत. ज्येष्ठ महिलांनादेखील येथे जुमानण्यात येत नाही. लहान मोठ्या चोऱ्या करणे, मारामारी करणे, स्थानिक नागरिकांना धमकावणे, अंमली पदार्थाचा व्यवसाय करणे, वेश्याव्यवसाय करणे अशा प्रकरचे अनैतिक प्रकार याठिकाणी सर्रासपणे होत आहेत. दरम्यान, हे गुन्हेगारी प्रकार घडल्यानंतर पोलीस येऊन तात्पुरती कारवाई करून जातात, मात्र पुन्हा जैसे थे परिस्थिती याठिकाणी पहावयास मिळते. आसपासच्या नागरिकांचे खूप मोठे नुकसान होत असल्याची बाब मंगल घरत यांनी आयुक्तांच्या लक्षात आणून दिली.

दरम्यान, नवी मुंबईतील नागरिकांनी महापालिकेस सर्व टॅक्स इमाने इतबारे भरून काबडकष्ट करून तेथे घरे घेतलेली आहेत, मात्र बेकायदा झोपडपट्टीमुळे नागरिकांना होणाऱ्या या त्रासाबदल वारंवार पत्र व्यवहार व आंदोलन करूनही जर कारवाई होत नसेल तर हा आमचा गुन्हा होतो काय? असा सवाल उपस्थित करून जर नागरिकांना न्याय मिळत नसेल, तर त्यांनी काय करायचे? असा उपरोधिक सवालही मंगल घरत यांनी निवेदनातून उपस्थित केला आहे.

गुरुवारी याठिकाणी एका तरुणीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला गेला, ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे महिला व मुली तिथं सुरक्षित राहत नसतील, तर नागरिकांना प्रशासनाचा उपयोग तो काय असा सवाल उपस्थित करून बांगलादेशी नागरिकांमुळे त्रस्त असलेल्या या भागातील नागरिकांची सुटका करण्यासाठी त्वरित या झोपडपट्टीवर कारवाई करून नागरिकांना न्याय द्यावा, अन्यथा येत्या काळात संतप्त नागरिक मुख्यालयासमोर झोपडपट्ट्या बांधण्यासह जनउद्रेक होऊन स्थानिक लोक कायदा हातात घेतील, असा इशारा मंगल धरत यांच्यासह समस्त महिलांनी दिला आहे.

**आयुक्तांचे आश्वासन**

*नुकतीच या ठिकाणी एका महिलेचा विनयभंग करण्यात आला होता. या प्रसंगामुळे आक्रमक होत भाजपच्या महिला मोर्चा सरचिटणीस मंगल घरत यांनी पालिका आयुक्तांची भेट घेतली व या झोपडपट्टीवर कारवाई करण्याची मागणी केली. या वेळी आयुक्तांनी लवकरात लवकर या झोपडपट्टीवर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.*

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात व्याख्यान



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. २५) वाणिज्य शास्त्र विभागाच्या वतीने गुड्स अॅण्ड सर्विसेस टॅक्सिसवरती व्याख्यान आयोजित केले होते.

या व्याख्यानासाठी मुंबई विद्यापीठातील फायनान्स अॅण्ड अकाउंट ऑफिसर सी.ए. डॉ. प्रदीप कामठेकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या व्याख्यानामध्ये प्रमुख वक्त्यांनी महाविद्यालयातील तृतीय वर्षाच्या वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना कराचे वेगवेगळे प्रकार, वेगवेगळ्या राज्यांमध्ये कशा पद्धतीने कर आकारला जातो तसेच केंद्रामध्ये कशा पद्धतीने कर आकारला जातो, इंटिग्रेटेड कर काय आहे, जीएसटी याबद्दल सविस्तर माहिती व मोलाचे मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी व्याख्यानासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या. या व्याख्यानासाठी वाणिज्य शाखेतील सुमारे ७० विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. व्याख्यानाच्या शेवटी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील वेगवेगळ्या विद्यार्थ्यांनी शंका उपस्थित करून व प्रमुख वक्त्यांनी त्या शंकांचे निरसन केले.

या व्याख्यानाचे आयोजन प्रा. राहुल कांबळे विभाग प्रमुख (वाणिज्य विभाग) यांनी केले तसेच प्रा. नम्रता गजरा, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. नम्रता पारिक, प्रा. डॉ. अविनाश जुमारे प्रा. डॉ. फारुक शेख ,प्रा. कावेरी घोगरे, प्रा. योगिता पाटील व प्रा. तनुजा सुमन यांनी सहकार्य केले.

# लोकमान्य सोसायटीची महिलांसाठी नवी योजना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नव्या युगात स्त्री ही केवळ गृहिणी नाही, तर ती निर्णय घेणारी, कर्तृत्ववान आणि पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. सहकार क्षेत्रातील अग्रगण्य लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी नेहमीच महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देते.

लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटीच्या ५५ टक्के कर्मचारी ह्या महिला आहेत आणि त्यापैकी अनेक त्यांच्या विभागाचे व शाखांचे नेतृत्व करतात. २१३ शाखांचे विस्तार असणारी लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा आणि दिल्लीमध्ये उपलब्ध आहे.

लोकमान्य नारी सन्मान ठेव योजना ही केवळ महिला ठेवीदारांसाठी (लहान मुलींसाठीसुद्धा) उपलब्ध आहे. ठेवीदाराला ९.६० टक्के आकर्षक व्याज मिळेल. ठेवीची मुदत १८ महिने आहे. किमान गुंतवणूक रु दहा हजार किंवा त्यापुढे हजाराच्या पटीत असेल. सभासद महिला जास्तीतजास्त कितीही रक्कम गुंतवू शकतील. ज्येष्ठ नागरिक महिला अतिरिक्त ०. ५० टक्के व्याजासाठी पात्र आहेत. काही अटी व शर्तींवर ठेवी आणि मुदतपूर्व पैसे काढण्यासाठी कर्जाची सुविधा उपलब्ध आहे. १० लाखाहून अधिक एकरक्कमी ठेव पावतीवर सुद्धा अधिक व्याज दर मिळणार आहे. लोकमान्य नारी सन्मान ठेव योजना मर्यादित काळासाठी असून ३१ मे २०२३ पर्यंत कार्यान्वित राहील.

अधिक माहितीसाठी लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटीच्या जवळच्या शाखेशी संपर्क साधा किंवा टोल फ्री नंबरवर १८००२१२४०५०वर कॉल करा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मनोज पाटील यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

पाणदिवे गावातील सामाजिक कार्यकर्ते व सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील सुधागड विद्या संकुलात कार्यरत असणारे माध्यमिक शिक्षक मनोज महादेव पाटील यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील गुणवंत माध्यमिक शिक्षकांना देण्यात येणारा यंदाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार



मुंबई येथील कार्यक्रमात पर्यटन व महिला बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो. सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वसंतराव ओसवाल, उपाध्यक्ष रवींद्र लिमये, कार्यवाह गीता पालरेचा, सचिव रविकांत घोसाळकर आदींच्या प्रोत्साहनामुळेच हा पुरस्कार मिळाला असल्याचे मनोज पाटील यांनी व्यक्त केले आहे. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व रोख एक लाख ११ हजार रूपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या वेळी शिक्षक आमदार कपिल पाटील, शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजितसिंह देवोल आदी उपस्थित होते.

# रेशन दुकानातील धान्यात अळी

## भाजपकडून मुरूड तहसीलदारांना तक्रारीचे निवेदन





**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील सर्व रास्त भाव दुकानांमध्ये निकृष्ट दर्जाचे आळ्या असलेले धान्य वितरित होत असून लोकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. निकृष्ट अळ्या असलेले धान्य कंत्राटी कामगारांमार्फत साफ करून त्याचे वितरण मुरुड तालुक्यातील सर्व रास्त भाव धान्य दुकानात वितरित करीत असून त्यामुळे गरीब व सामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. यावर मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांनी तातडीने लक्ष देऊन चांगले धान्य वितरित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे भाजपच्या मुरुड तालुका उपाध्यक्ष महेश मानकर यांनी निवेदनातून केली आहे.

### चांगल्या दर्जाचे धान्य द्या; अन्यथा आंदोलन!

**याबाबत भाजप उपाध्यक्ष महेश मानकर यांनी सांगितले कि, शासनाकडून येणारा तांदूळ हा चांगल्या प्रतीचा असून तो मांडला येथील सरकारी गोदामात साठवला जातो. मुरुड गोदाममधून सन २०२०-२१ चा निकृष्ठ दर्जाचा तांदूळ रास्त धान्य दुकानदारांना देऊन राज्य सरकारचे नाव बदनाम केले जात आहे. यासाठी लवकरात लवकर चांगला तांदूळ देण्याची सोय केली जावी अन्यथा जनआंदोलन करण्याचा इशारा यावेळी दिला आहे.**

याबाबतचे निवेदन तहसीलदार रोहन शिंदे याना देताना मुरुड तालुका भाजप अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष महेश मानकर, उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण, मुरुड शहर अध्यक्ष उमेश माळी, संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, सरचिटणीस नरेश वारगे, युवा अध्यक्ष समीर शिंदे, शहर चिटणीस अभिजित पालवणकर, संदीप घरत, प्रवीण भाटकर आदी उपस्थित होते.

यापूर्वी मुरुड तहसीलदारांना २५-१०-२०२२ व भाजप उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांनी निवेदन देऊन याबाबतची परिस्थिती समोर आणून सुद्धा मुरुड तहसील कार्यालयाकडून कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही. याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

निकृष्ट धान्य पुरवठा होत असताना कोणतीही कार्यवाही तहसील कार्यालयाकडून होत नाही. हे पाहून सर्व भाजप कार्यकर्त्यांनी मुरुड शहरात असणाऱ्या गोदामाला भेट देऊन ही मागणी केली असता भयावह सत्य समोर आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या गोदामामध्ये कबुतरांनी घरटे बनवले असून काही कबुतरे मृत आढळून आली आहेत. सन २०२० व २०२१ चा तांदूळ गोदामात असून हा तांदूळ अळ्या पडलेल्या व निकृष्ट दर्जाचा तांदूळ साफ करून तोच तांदूळ पुन्हा रास्त भाव दुकानांमध्ये पाठवला जात आहे. त्यामुळे लोकांच्या आरोग्याचा मोठा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे.

काही ठिकाणी गोदामामध्ये उंदीर, घुशी, मृतावस्थेत आढळून आलेल्या आहेत. गोडाऊन रिपेअरिंगचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. धान्य सुरक्षित ठेवण्यात निष्काळजीपणा होत असल्याची बाब यावेळी समोर आणण्यात आली आहे.

चांगले अन्न वितरित करून मुरुड तालुक्यातील नागरिकांना दिलासा देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली आहे.

# बोर्ली मोरापाडा येथे अल्पवयीन मुलीवर बलात्कार; गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीतील बोर्ली मोरापाडा येथे आठ वर्षीय मुलींवर बलात्कार केल्याची घटना घडली असून आरोपी रेवदंडा पोलिसांनी जेरबंद केले आहे. याबाबत संप्तत प्रतिक्रिया उमटत आहेत.

मुरूड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायत हद्दीतील बोर्ली मोरापाडा येथे (दि. २३) दहा वाजता ५५ वर्षीय आरोपी राजेश शिने याने आठ वर्षीय अल्पवयीन मुलींस तुला घरात काहीतरी दाखवतो चल, असे म्हणून तिचा हात धरून घरात घेवून गेले. घराचा दरवाजा बंद करून तिच्याशी अश्लिल कृत्य करून बलात्कार केला, अशी तक्रार रेवदंडा पोलिसाकडे महिला फिर्यादी यांनी केली आहे. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्याकडे या तक्रारीची २५/२०२५ अशी नोंद करण्यात आली असून भादवी कलम ३७६, बाल लैगिक अत्याचार सरक्षंण पास्को अंतर्गत अधिनियम २०१२ चे कलम ३,४,७,८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक सविता गोसावी करीत आहेत.


Adv. Mithun Khaire

**IN THE COURT OF THE CIVIL JUDGE (JUNIOR DIVISION) PANVEL CIVIL MISCELLANEOUS APPLICATION 69 OF 2023**

1. Smt. Surekha Shamkant Bhoir
   Age 52 years House No. 183, Near
   Shri Krishna Temple, Mu- Post, Aadai,
   Aadai Panvel, Raigad,
   Maharashtra-410 206
2. Sachin Shamkant Bhoir
   Age 34 years House No. 183,
   Near Shri Krishna Temple, Mu- Post,
   Aadai, Aadai Panvel, Raigad,
   Maharashtra - 410 206
3. Suraj Shamkant Bhoir
   Age 28 years House No. 183,
   Near Shri Krishna Temple, Mu- Post,
   Aadai, Aadai Panvel, Raigad,
   Maharashtra 410 206 - ...Applicants

V/S

Nil ...Opponent

Whereas the applicants above named have file an application before this court for grant of Heirship Certificate. more particular described in scheduled hereunder, left by the deceased Mr. Shamkant Kamlya Bhoir who died on July 29, 2021 at Criticare Hospital Kamuthe Panvel.

Whereas the above named applicants have filed Misc. Application for Heirship Certificate under 1 of Bombay Regulation Act VIII of 1927, the Court of Civil Judge (J. D.) at Panvel..

You the member of the public are hereby given notice to appear in the court of Civil Judge (J. D.) at Panvel in person or by pleader duly instructed and to file your say or objection of any within 30 days 'from the date of publication that there are no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hand & seal of the court this 13 March, 2023

Court Stamp

**sign/-**
**Asst Supted**
**Civil Court S. D. Panvel**


# मराठी माध्यमाच्या शाळा वाचविणे काळाची गरज -आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे



(छाया : जयवंत माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

इंग्रजीचे शिक्षण आपल्या पाल्याला मिळावे म्हणून पालक प्रयत्नशील आहेत. इंग्रजी विषयाचे पुस्तक सोपे झाले पाहिजे. त्याकरिता शासनाकडे पाठपुरावा करणार आहे, पण मराठी माध्यमाच्या शाळा वाचविणे हीसुद्धा काळाची गरज आहे. त्यामुळे पालकांनी मातृभाषेकडे पाठ फिरवू नये, असे आवाहन कोकण शिक्षक मतदारसंघाचे नवचनिर्वाचित आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी शनिवारी (दि. २५) खोपोली येथे केले.

खोपोली शहर भारतीय जनता पक्षातर्फे नवनिर्वाचित आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या सत्काराचा कार्यक्रम महाराजा मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला होता. व्यासपीठावर स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, भाजपचे खोपोली शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, प्रभारी सुनील घरत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, शहर अध्यक्ष शोर्भा काटे, माजी नगरसेविका अपर्णा मोरे, कामगार आघाडी सेलचे संयोजक सूर्यकांत देशमुख, शिवसेना विधानसभा संपर्कप्रमुख विजय पाटील, शहराध्यक्ष संदीप पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष श्रीकांत पुरी, ओबीसी सेलचे रामभाऊ पवार, वैद्यकीय सेलचे डॉ. नागरगोजे, नचिकेत पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष अजय इंगुलकर, सरचिटणीस विनायक माडपे यांच्यासह भाजप, शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विरोधकांच्या टीकेला विकासकामांतून उत्तर देणार -आमदार महेंद्र थोरवे

केंद्र व राज्य शासन या डबल इंजिनच्या माध्यमातून मतदारसंघात यापूर्वी दुर्लक्षित केले गेलेले प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. यापूर्वी खोपोली नगरीत सोन्याचा धूर निघत होता. ते गतवैभव परत मिळवून देण्यासाठी आमचा प्रयत्न असेल. विरोधकांनी किती टीका केली तरी त्याचे उत्तर आम्ही विकासकामांच्या माध्यमातून देणार आहोत, असे प्रतिपादन स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी या वेळी केले.

आपल्या भाषणात ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी हा विजय केवळ माझा नसून सर्वांचा विजय असल्याचे सांगताना कोकण प्रांतातीलच नव्हे; तर महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाचे वाचा फोडण्याचे काम आपण करणार असल्याचे म्हटले. शिक्षक मतदारसंघाचा निधी हा शिक्षणसंबंधी खात्यावरच खर्च करायचा असताना यापूर्वीच्या आमदारांनी रस्ता व गटार यावर खर्च केला. आता मी ग्रामीण भागातील शाळांचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेणार आहे, असेही ते म्हणाले.

स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या कार्याचा गौरव केला. यापूर्वी शिक्षक मतदारसंघातून एवढे प्रतिनिधी निवडून गेले, पण ज्ञानेश्वर म्हात्रेंसारखा अभ्यासू आमदार झाला नसल्याचे सांगताना भाजप व शिवसेना युतीच्या माध्यमातून जे जे या भागातील प्रश्न आहे ते आम्ही एकत्रितपणे येऊन सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

खोपोली शहरासाठी १४० कोटींचा भुयारी गटार प्रकल्प मंजूर केला आहे तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज या दोन्ही महापुरुषांच्या पुतळ्याच्या परिसरातील विकासकामांसाठी निधी दिला आहे. आम्ही कार्यकर्त्यांना सांगितले की आपल्या भागातील जे प्रलंबित प्रश्न आहेत ते आपण सांगावे. प्रस्ताव मांडून त्यासाठी निधी मंजूर करून घेऊ. सध्याचे राज्यातील सरकार दूरदृष्टी ठेवून काम करीत असल्यामुळे या महाराष्ट्राचा कायापालट करण्याचा संकल्प युती शासनाने केला आहे, असेही आमदार थोरवे यांनी नमूद केले.

जिल्हा कामगार संयोजक सूर्यकांत देशमुख यांनी प्रस्ताविकात शहर भाजपच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. या वेळी शिक्षण क्षेत्रातील विविध संस्था व शिक्षक संघटनांनी तसेच स्थानिक कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचा सत्कार केला.

# शिरवली येथील कंपनीसमोर कामगार कुटुंबाचा ठिय्या




**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूरातील वावोशी हद्दीतील हुतामाकी कंपनी व्यवस्थापनाने शिरवली गावासह वावोशी, गोरठण बुद्रुक आदी स्थानिक गावातील कामगारांना अचानक कामावरून काढून टाकत असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी आक्रमक पावित्रा घेत कंपनीच्या गेटसमोर कामगारांचे कुटुंब आणि ग्रामस्थांनी ठिय्या मांडला आहे.

आज एका कामगाराला अचानक कामावरून काढले उद्या आमच्या गावातील, घरातील प्रत्येक कामगाराला त्यांनी कामावरून काढले तर आमच्या कुटुंबाचे काय? आम्ही खायचे काय? आमच्यावर उपासमारीची वेळ येईल व आमचे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होईल या धास्तीने येथील स्थानिक महिला देखील आक्रमक झाल्या होत्या.

कंपनीने कामगारांविरुद्ध हूकुमशाही पद्धतीचे निर्णय मागे घ्यावेत. याकरिता शिरवली ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच शैलेश मोरे, शंकर मानकावळे, एच. आर. पाटील यांनी कंपनी प्रशासनासोबत चर्चा केली परंतु कंपनी प्रशासनाने आपला निर्णय वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून शुक्रवारी देणार असल्याचे सांगितले होते. परंतू ठोस निर्णय तात्काळ होत नाही तोपर्यंत आम्ही गेटवरील आमचे ठिय्या आंदोलन सोडणार नाही अशी भूमिका स्थानिक महिला व ग्रामस्थांनी घेतली होती. शिवाय येथील संतप्त झालेल्या स्थानिक गावातील ग्रामस्थांचा जमाव देखील वाढतच होता. त्यामुळे बराच वेळ येथील परिस्थिती तणावपूर्ण बनलेली होती. या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता खालापूरचे पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक एन. आरोटे, निलेश सोनावणे यांनी स्थानिक ग्रामस्थ व कंपनी प्रशासन यांच्याशी चर्चा करून ही परिस्थिती नियंत्रणात आणली असून लवकरच हुतामाकी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आपला निर्णय देणार आहेत. हुतामाकी कंपनी व्यवस्थापन काय निर्णय घेत आहे, याकडे कामगार कुटुंबिय आणि ग्रामस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.


**प्रगती हाईट्स को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.**
**प्लॉट नं. ८२ ते ८६, सेक्टर-३४, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड**

**जाहीर निविदा**

सर्व अधिकृत ठेकेदार यांस कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे कामासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत ठेकेदारांच्या दिनांक २३/०२/२०२३ ते २८/०२/२०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत निविदा स्वीकारल्या जातील.

आलेल्या निविदा दिनांक ०५/०३/२०२३ रोजी सकाळी ९:३० वाजता उघडणेत येतील. त्यावेळी उपस्थित रहावे. कोणतीही निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार प्रगती हाईट्स सोसायटीच्या कमिटीकडे राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रगती हाईट्स सोसायटीसाठी जमीनीखालील ३०,००० लिटर पाणी क्षमतेची टाकी बनविणे. | ५०००००/- |

दि. : २३/०२/२०२३

**प्रगती हाईट्स को-ऑप. हौ. सो. लि.**
**सही/-** **चेअरमन** **सही/-** **सेक्रेटरी**



MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost in Lakh | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-02/ 23-24/ **RFx No. 7000026337** | Work of Cleaning & Sweeping of Office Premises at 400kV Nagothane, 220kV IPCL and MSETCL Colony along with Operating Water Supply System to all Buildings Every day under 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane. | Rs. 2,88,045/- | 03.03.2023 up to 16:00 Hrs. |

**EMD:** Rs. 5,000/- **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in Contact Person:** Mitesh Goyal Mob. No. 9461456635 e-mail ID: **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**



MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (SECOND CALL)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification:

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender-57/ 2022-23 Dtd. 07.02.2023 **RFx No. 7000026115** | **Sub: Second Call** for SRM E-Tender for the work of replacement of 22 kV twin bus for bus section 1 at 220 kV Mahad Substation under EHV (O&M) Division, Mahad for the year 2022-23. | Up to Rs. 5,44,945/- (Including GST + 1% Labour Cess) |

**EMD** will be 1% of the **Estimated Cost** or Rs. 5,000/- whichever is higher **Tender Fee**: Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.

**Bid Submission is From:** 27.02.2023 @ 00:00 Hrs to 05.03.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089

**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**


# डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त माणगावात स्वच्छता अभियान

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा ता. अलिबाग अंतर्गत महाराष्ट्रभूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार १ मार्च रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ यावेळेत ग्रामस्वच्छता अभियान कर्यक्रमाचे आयोजन माणगाव, तळा तालुक्यातील श्री. सदस्यांमार्फत करण्यात आले आहे.

संपूर्ण भारत स्वच्छ कार्यक्रमातर्गत नागरिकांना स्वच्छतेचा संदेश देत स्वच्छता दूत डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी श्री सदस्यांमार्फत स्वच्छता अभियान कार्यक्रम चांगल्या प्रकारे राबविला जात आहे. स्वच्छतेच्या बाबतीत या प्रतिष्ठानतर्फे अनेक गावे चकाचक करण्यात आली आहेत. अभियानात सर्व श्री सदस्य तन-मन लावून श्रमदान करीत असतात. माणगावमधील तहसील कार्यालय परिसर, उपजिल्हा रुग्णालय परिसर, एस.टी.बस स्थानक परिसर, शासकीय विश्रामगृह परिसर, बांधकाम खाते परिसर, मुंबई-गोवा महामार्ग दुतर्फा, बामणोली रोड, मोर्बा रोड, निजामपूर रोड, साई नगर, कालवा परिसर आदि सर्वच ठिकाणे हे श्री सदस्य श्रमदान करून ओला व सुका कचरा वेगळा करून त्याची योग्य त्या ठिकाणी विल्हेवाट लावून गाव चकाचक करीत असतात. या कार्यक्रमाची जोरदार तयारी माणगाव व तळा तालुक्यातील श्री सदस्यांकडून करण्यात आली आहे.

(पान ५ वरून)

| | | | |
|---|---|---|---|
| ५८ | ८/२ | १९.०० | २.०० |
| ५९ | ४८/१६ | १३.०० | १२.४० |
| **एकूण** | | **२०९९.४** | **३७२.७५** |

**मौजे ताम्हाणे, ता. महाड, जि. रायगड**

| अ.क्र. | गट नंबर | एकूण क्षेत्र (हे. आर) | संपादित क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | २८३ | ५२२.०० | ३८.७० |
| २ | २८४ | २४७.०० | ४.४० |
| ३ | २९२ | ७०.०० | ८.८० |
| ४ | २९१ | ४८.०० | ११.६० |
| ५ | २९३ | ९९.०० | १३.५० |
| ६ | २९४ | ३५.०० | ०.०७ |
| ७ | २९७ | ४६.०० | २४.७० |
| ८ | २९६ | १४२.०० | २७.८० |
| ९ | २९८ | १३६.०० | १४.५० |
| १० | ३०५ | २९.०० | ५.४० |
| ११ | ३०६ | २३५.०० | ३१.०० |
| **एकूण** | | **१६०९.००** | **१८०.४७** |

**ठिकाण : महाड**
**दिनांक : १३/०२/२०२३**
**क्र. जिमाका/राअ/जाहि./२३०/२०२२-२३**

**सही/-**
**(प्रतिमा पुदलवाड-शेंगुलवार)**
**उपविभागीय अधिकारी**
**महाड उपविभागीय महाड**

### महिला ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा

# आज ऑस्ट्रेलिया-द. आफ्रिका फायनल

**केपटाउन : वृत्तसंस्था**

महिला ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात रविवारी (दि. २६) अंतिम फेरीचा सामना होणार आहे. ऑस्ट्रेलियाने भारताला, तर दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडला नमवून फायनलमध्ये धडक दिली आहे.

दक्षिण आफ्रिकेने शुक्रवारी इंग्लंडला सहा धावांनी पराभवाचा धक्का देत महिला ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेची प्रथमच अंतिम फेरी गाठली. तझमिन ब्रिट्स (५५ चेंडूंत ६८ धावा) आणि लॉरा वोल्व्हार्ड (४४ चेंडूंत ५३) या सलामीवीरांची अप्रतिम फलंदाजी तसेच अयाबोंगा खाका (४/२९) आणि शबनिम इस्माइल (३/२७) या वेगवान गोलंदाजांच्या प्रभावी माऱ्याच्या बळावर आफ्रिकेने विजय संपादन केला.



उपांत्य फेरीच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना यजमान दक्षिण आफ्रिकेने २० षटकांत ४ बाद १६४ अशी धावसंख्या केली. प्रत्युत्तरात इंग्लंडला १८ चेंडूंत २८ धावांची आवश्यकता होती. त्या वेळी अयाबोंगा खाकाने तीन धावांच्या मोबदल्यात तीन खेळाडू बाद करीत सामना दक्षिण आफ्रिकेच्या बाजूने वळवला. इंग्लंडचा डाव २० षटकांत ८ बाद १५८ धावांवर मर्यादित राहिला. आता आफ्रिका संघ अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाशी भिडेल.

#### असा फिरला दुसरा उपांत्य सामना...

दक्षिण आफ्रिकेची वेगवान गोलंदाज अयाबोंगा खाका हिने भेदक मारा करीत उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात इंग्लंडच्या चार फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला. धावांचा पाठलाग करणारा इंग्लंडचा संघ विजयाच्या उंबरठ्यावर होता, पण १८व्या षटकात सामना फिरला. या षटकात खाका हिने इंग्लंडच्या तीन फलंदाजांना बाद करीत बाजी पलटवली. आता जेतेपदाच्या लढतीत आफ्रिकन संघासमोर पाच वेळा विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाचे आव्हान आहे.

# जेम्स अँडरसनने मोडला मुथय्या मुरलीधरनचा विक्रम

**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन सध्या कारकिर्दीच्या अशा टप्प्यावर आहे, जिथे प्रत्येक सामन्यात तो एकतर मोठा पराक्रम करीत आहे किंवा विक्रम मोडत आहे. ४० वर्षीय अँडरसनने आणखी एक टप्पा गाठला आहे. कसोटीतील दुसऱ्या डावात सर्वाधिक विकेट घेण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने या बाबतीत श्रीलंकेचा माजी दिग्गज फिरकीपटू मुरलीधरनचा विक्रम मोडला.

अँडरसनने इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात वेलिंग्टनच्या बेसिन रिझर्व्ह मैदानावर हा पराक्रम केला. त्याने सामन्याच्या दुसऱ्या दिवशी तीन गडी बाद केले. अँडरसनने आपल्या कसोटी कारकिर्दीत आतापर्यंत दुसऱ्या डावात २३१ विकेट्स घेतल्या आहेत. त्याचवेळी मुरलीधरनने दुसऱ्या डावात २२८ विकेट घेतल्या आहेत, मात्र पहिल्या आणि तिसऱ्या डावात सर्वाधिक विकेट घेण्याचा विक्रम अजूनही मुरलीधरनच्या नावावर आहे. मुरलीधरनने पहिल्या डावात २३० आणि तिसऱ्या डावात २३६ विकेट्स घेतल्या आहेत.

ऑस्ट्रेलियाचा महान फिरकी गोलंदाज शेन वॉर्नने चौथ्या डावात सर्वाधिक विकेट्स घेतल्या आहेत. त्याने १३८ विकेट्स आपल्या नावावर केल्या आहेत. विशेष म्हणजे मुरलीधरनने (८००) कसोटीत सर्वाधिक विकेट्स घेतल्या आहेत. त्याच्या खालोखाल वॉर्न (७०८) तर अँडरसन (६८५) तिसऱ्या स्थानावर आहे.



# परमार पॉलिटेक्निक कॉलेज क्रीडा स्पर्धेत इलेक्ट्रिकल डिपार्टमेंट विजेता



(छाया : राज वैशंपायन)

**नागोठणे : प्रतिनिधी**

क्षितीज क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने शेठ श्री ओटरमल शेशमल परमार पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये विविध क्रीडा स्पर्धा झाल्या. यामध्ये इलेक्ट्रिकल डिपार्टमेंटने सर्वाधिक स्पर्धा जिंकत बाजी मारत विजेतेपदाचा मान पटकाविला.

या वेळी क्रिकेट, व्हॉलीबॉल, डॉजबॉल, कॅरम, बुद्धीबळ, बॅडमिंटन, कबड्डी अशा सर्व मैदानी व इनडोअर खेळाचा आनंद विद्यार्थ्यांनी मनमुराद लुटला. विद्यार्थ्यांबरोबरच भारती एज्युकेशन सोसायटीच्या संकुलातील सेकंडरी स्कूल, फार्मसी कॉलेज, पॉलिटेक्निक कॉलेजमधील सर्व स्टाफसाठी बॉक्स क्रिकेट स्पर्धाही खेळविण्यात आली.

भारती एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिक जैन, पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य जैन, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य समीर पवार व सेकंडरी स्कूलचे प्राचार्य भूषण टक्के यांच्या नेतृत्वाखालील चार संघांत ही स्पर्धा झाली, ज्यामध्ये टक्के यांच्या संघाने विजेतेपद जिंकले, तर जैन यांचा संघ उपविजेता ठरला.

# मुंबई इंडियन्स महिला संघाच्या जर्सीचे अनावरण

**मुंबई : प्रतिनिधी**


पहिल्यावहिल्या महिला प्रीमिअर लीगमधील संघ मुंबई इंडियन्सने शनिवारी (दि. २५) त्यांच्या जर्सीचे अनावरण केले.

महिला प्रीमिअर लीगमध्ये गुजरात जायंट्स, यूपी वॉरियर्स, मुंबई इंडियन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्स असे संघ आहेत. भारताची स्टार क्रिकेटपटू स्मृती मानधना ही सर्वाधिक ३.४० कोटी रक्कम घेणारी खेळाडू ठरली आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने तिला आपल्या ताफ्यात दाखल करून घेतले. ॲशली गार्डनर (ऑस्ट्रेलिया)साठी गुजरात जायंट्सने ३.२ कोटी रुपये मोजले, तर भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर मुंबई इंडियन्सकडून खेळणार आहे. तिला १.८० कोटींची बोली लागली.




# जागतिक कबड्डी स्पर्धेसाठी जितेश शिरवाडकर सामनाधिकारी

**मुंबई : प्रतिनिधी**



इराणमध्ये होणाऱ्या दुसऱ्या कुमार जागतिक कबड्डी स्पर्धेसाठी मुंबईच्या प्रभादेवीतील ओम् कबड्डी मंडळाचे माजी सरचिटणीस व आंतरराष्ट्रीय पंच जितेश शिरवाडकर याची महाराष्ट्रातून सामनाधिकारी (पंच) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

इराण कबड्डी संघटनेच्या वतीने २६ फेब्रुवारी ते ६ मार्च या कालावधीत इराणमधील ऊर्मीय येथे दुसरी कुमार जागतिक कबड्डी स्पर्धा होणार आहे. यासाठी सामनाधिकारी (पंच) म्हणून नियुक्ती झालेले जितेश शिरवाडकर यांनी प्रो-कबड्डीच्या सुरुवातीपासून आजतागायत सलग सामनाधिकारी म्हणून काम पाहिले आहे. इराण येथील एशियाड तसेच दुबई येथे झालेल्या कबड्डी स्पर्धेतदेखील त्यांनी पंच म्हणून कामगिरी केली आहे.


# तिसऱ्या कसोटीतून भरतला मिळणार डच्चू?

**इंदूर : वृत्तसंस्था**



ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू असलेल्या कसोटीमध्ये विकेटकीपर केएस भरत आणि इशान किशन या दोन खेळाडूंना संधी देण्यात आली, मात्र दोन्ही सामन्यात भरत फ्लॉप ठरला. त्यामुळे तिसऱ्या कसोटी सामन्यातून त्याला डच्चू देण्यात येणार आहे.

ऋषभ पंतच्या जागेवर केएस भरतला खेळण्याची संधी देण्यात आली होती, पण त्याला या संधीचे सोन करता आले नाही. भरतची खेळी पाहिली तर पहिल्या सामन्यात तो आठ धावा बनवून माघारी परतला. दुसऱ्या डावात त्याच्याकडून भारतीय संघाला मोठ्या खेळीची अपेक्षा होती, मात्र त्याने सहा धावा करून आपली विकेट गमावली. दुसऱ्या डावात त्याने २३ नाबाद धावा केल्या, मात्र त्याचा फारसा फायदा संघाला झाला नाही.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com